# माणूस

शनिवार । ९ डिसेंबर १९७८ । ७५ पैसे


मुंबई वार्ता । विनय सहस्रबुद्धे

## प्रचंड विरोध असलेले औद्योगिक संबंध विधेयक

एकाच क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना सहसा कोणत्याही मुद्द्यावर एकत्र येत नाहीत, हा नेहमीचा अनुभव! जनता सरकारने सुचविलेल्या नव्या औद्योगिक संबंध विधेयकाला विरोध करण्यासाठी मात्र इंटकपासून भारतीय मजदूर संघापर्यंत तमाम कामगार-संघटना एकत्र आल्या आहेत.

हे विधेयक औद्योगिक क्षेत्रात कामगार, मालक आणि शासन यांचे परस्पर संबंध आणि परस्परांचे अधिकार नव्याने निश्चित करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. काही वर्षांपूर्वी केंद्रसरकारने या सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी एक 'कामगार आयोग' नेमला होता. या आयोगाने आपला अहवाल १९६९ मध्येच केंद्राला सादर केला होता. या अहवालावर इंदिरा गांधींच्या राजवटीत कोणतीही कारवाई झाली नाही. जनता सरकारने मात्र त्यातल्या काही शिफारशी स्वीकारून प्रचलित व्यवस्थेत परिवर्तन करण्यासाठी सर्वसमावेशक असे हे औद्योगिक संबंध विधेयक तयार केले आहे. हे विधेयक मंजूर झाले तर मुंबई कामगार कायदा आणि अन्य दोन-तीन कायदे रद्दबातल ठरतील व त्यांची जागा या विधेयकातील तरतुदी घेतील.

'कामगार-चळवळीला अधिक विधायक दृष्टिकोन देणारे व कामगार-चळवळ अधिक सशक्त करणारे' असे या विधेयकाचे सरकारी वर्णन आहे. प्रत्यक्षात मात्र कामगार-संघटनांना पंगू बनविणारे हे विधेयक आहे, हे त्यातील काही ठळक कामगारविरोधी कलमे बघितल्यास लक्षात येते. या विधेयकाचा चांगला भागही या कामगार-स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या तरतुदींमुळे झाकाळून गेला आहे.

या विधेयकामुळे कामगारांचा संप करण्याचा मूलभूत हक्कच हिरावून घेण्यात आला आहे. 'संप करण्यापूर्वी द्विपक्षीय वाटाघाटी केल्याच पाहिजेत' ही या विधेयकातील तरतूद सामान्यतः स्वागतार्ह आहे; पण या तरतुदीची पोटकलमे इतकी जाचक आहेत की संपाचे शस्त्र उगारण्यात कोणताही अर्थ उरत नाही.

मुख्य म्हणजे अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना हे विधेयक संपाचा अधिकार 'पूर्णपणे' नाकारते. शिवाय अमुक एक सेवा अत्यावश्यक ठरविण्याचा अधिकार सरकारकडे सुरक्षित आहे. या विधेयकाच्या कलम ७९ आणि ९१ अन्वये कोणत्याही उद्योगातील संपावर बंदी घालण्याचा अधिकार शासनाला मिळाला आहे. तसेच आणखी एका कलमान्वये संप-तंटयात हस्तक्षेप करण्याचा आणि सक्तीने सर्व प्रकरण लवादाकडे सोपविण्याचा अधिकार सरकारला मिळाला आहे. एकदा प्रकरण लवादाकडे गेले की, संप बेकायदेशीर ठरतो हे लक्षात घेता संपशस्त्राची धार बोथट झाल्याचे मान्य करावे लागेल. कलम ७९ । १ (ब) अन्वये द्विपक्षीय वाटाघाटी फिस्कटल्यास प्रसंगी टाळेबंदी जाहीर करण्याचा अधिकारही सरकारने स्वतःकडे घेतला आहे.

बेकायदेशीर संपाबद्दलची व्याख्याही या विधेयकाने अधिक विस्तृत व ढोबळ बनविली आहे. शिवाय अशा संपानंतर होणारी सजाही अधिक कडक केली आहे. बेकायदेशीर संप म्हणजे संपाबाबतची सूचना, मतदान वगैरे सुमारे वर्षभराची प्रक्रिया पार न पडता झालेला संप. वास्तविक संप हवा की नको याबद्दल मतदान घेण्याची तरतूद स्वागतार्हच आहे; पण यावर कामगार-नेत्यांचे म्हणणे असे की, ही लांबलचक प्रक्रिया, कामगार, रजिस्ट्रार वगैरेंच्या वेळेनुसार पूर्ण होईपर्यंत संपासाठी आवश्यक तो 'टेंपो' निघून जातो. कामगारांची 'बार्गेनिंग पॉवर' या शब्दाला मग फारसा अर्थ उरत नाही.

या विधेयकाने 'अवैध कामगार चळवळीची' व्याख्या विस्तृत केली आहे. त्यामुळे नियमानुसार काम आणि 'अधिक वेळ काम करण्यास नकार देण्याचा' कामगारांचा हक्क हिरावून घेण्यात आला आहे.

या विधेयकातील एका तरतुदीमुळे एखाद्या कारखान्यातील कामगार-संघटनेला मान्यता देण्यासाठी 'गुप्त मतदानपद्धती' किंवा

# साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे–अंक अट्ठाविसावा**

**९ डिसेंबर १९७८**

**मूल्य ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

◘

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

◘

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

◘

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◘

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


'पाठिंबा पडताळून पहाण्याची पद्धत', 'सरकारी शिफारसीनुसार', लवाद अवलंबेल असे स्पष्ट करण्यात आले आहे. पाठिंबा पडताळून पहाण्यासाठी 'गुप्त मतदान' हीच योग्य पद्धत आहे, मग गुप्त मतदानाला पर्याय ठेवण्यात अर्थ काय ?

या विधेयकातल्या एका कलमात म्हटले आहे की, कामगार-तंटयानंतर कामगार व मालक यांच्यात एखादा समझोता झाल्यावर कामगारांना जी बक्षिसी (उभयपक्षी मान्यतेनुसार) मिळेल तिच्यात जनहित समोर ठेवून बदल करण्याचा सरकारला अधिकार आहे. आता मिळणाऱ्या बक्षिसीबाबत मिया-बिबी राजी असतील तर सरकारी काझीने हस्तक्षेप करण्याची गरजच काय ? समझोता मोडून अशांततेला निमंत्रण देण्यासारखेच हे नाही का ?

मात्र या विधेयकातील काही मोजक्या तरतुदी अशा आहेत की, कामगारसंघटनांच्या संभाव्य एकत्रित विरोधानंतरही त्या खऱ्याखुऱ्या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कायम ठेवल्या गेल्या पाहिजेत.

या विधेयकाने कामगार-संघटनेत कामगार नसलेले लोक किती असावेत यावर बंधने घातली आहेत. मात्र एखाद्या कारखान्यातून काढून टाकण्यात आलेली व्यक्ती 'कामगार नाही' असा जो निष्कर्ष काढण्यात आला आहे तो बदलायला हवा. तसेच एका कामगार-नेत्याने किती संघटनांचे नेतृत्व करावे यावरही घातलेली बंधने स्वागतार्ह आहेत. कोणत्याही कामगार-संघटनेत राजकारणात काम करणारी व्यक्ती पदाधिकारी रहाण्यास बंदी करणारी तरतूदही या विधेयकात समाविष्ट करायला हवी.

अमुक एका कामगाराला अन्यायाने काढून टाकल्यावर त्याला न्याय मिळविण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेली पद्धत वेळखाऊ आहे. या विधेयकाने अशी प्रकरणे झटपट निकालात काढण्यासाठी जे बदल सुचविले आहेत ते योग्य आहेत. शिवाय कामगार-न्यायालयांवर व लवादांवर आपला निकाल/अहवाल देण्यासाठी जे वेळेचे बंधन घातले आहे तेही आवश्यकच आहे

कारखान्यात ले-ऑफ जाहीर करणे, कामगारांना काढून टाकणे, त्यांचे कामाचे तास वाढविणे, कमी करणे इ. कोणतेही बदल २१ दिवसांच्या पूर्वसूचनेशिवाय न करण्याची एक चांगली तरतूद या विधेयकात आहे.

समतोल दृष्टी ठेवून या विधेयकात सुचविण्यात आलेली एक तरतूद महत्त्वाची आहे. या विधेयकामुळे प्रथमच मालकाची संपत्ती व एकूण मालमत्ता, आय-व्यय यांचे विवरण मागण्याचा हक्क कामगार-संघटनांना प्राप्त झाला आहे. त्याचबरोबर आपला वार्षिक ताळेबंद प्रसिद्ध करणे कामगार-संघटनांनाही बंधनकारक ठेवण्यात आले आहे.

याच समतोल-दृष्टिकोनातून संपूर्ण विधेयकाचा फेरविचार व्हावा अशी सर्व कामगार-संघटनांची मागणी आहे. विशेषतः या विधेयकाने सरकारला मोठ्या प्रमाणात अधिकार दिले आहेत व ही बाब विशेष चिंताजनक आहे.

औद्योगिक शांतता कायम राखण्याच्या दृष्टीने कामगार-मालक-संबंधांचा फेरविचार करताना शासनाने कामगार-प्रतिनिधी व मालक या उभयतांना विश्वासात घ्यायला हवे. प्रस्तुत विधेयक लोकसभेपुढे सविस्तर चर्चेसाठी येणे बाकी आहे. मजूरमंत्री रवींद्र वर्मा यांनी

तत्पूर्वीच त्यात वाजवी सुधारणा घडवून आणल्या तर कामगार-संघटनांच्या प्रचंड विरोधाला व त्याच्या अन्य परिणामांना तोंड द्यावे लागणार नाही. ◘

## ◻ देखणी प्रदर्शने

मुंबईत सध्या प्रेक्षणीय प्रदर्शनांचा सुकाळ आहे: काही मोजकी प्रदर्शने विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांपैकीच एक, जागतिक वन्य-जीवननिधीच्या विद्यमाने भरविण्यात आलेले, वन्य जीवनाच्या विविधाविष्कारांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन. गेल्या शुक्रवारीच पक्षी-तज्ज्ञ सलीम अली यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

भारतात मानवप्राण्यांची संख्या दिवसेंदिवस वेगाने वाढत आहे आणि कदाचित त्यापेक्षाही अधिक वेगाने वाघ, सिंह, पांढरे हत्ती, चित्ते इ. वन्य प्राण्यांची संख्या कमी कमी होत आहे. सिमेंटच्या भिंती आणि दिव्यांचे खांब यांच्या जंगलात रहाणाऱ्या मुंबईकरांना याची जाणीव व्हावी या उद्देशाने आणि शासनाच्या वन्य-जीवन-सप्ताहाचा एक भाग म्हणून हे प्रदर्शन आयोजिण्यात आले होते.

एम. कृष्णन आणि इ. हनुमंथाराव या दोन हौशी छायाचित्र-कारांनी कृष्ण-धवल रंगात टिपलेली छायाचित्रे विलक्षण जिवंत वाटतात. विशेषतः हिंस्र प्राण्यांचे त्यांनी खुबीने घेतलेले क्लोज-अप्स् वारंवार बघावेसे वाटतात. ठिपक्याठिपक्यांचे चित्ते आणि पट्टेरी वाघ यांच्या काही पोजेस छान टिपल्या आहेत. कळाहीन राणीचा बाग किंवा पेशवे पार्क बघून जे समाधान मिळणार नाही ते या प्रदर्शनातून मिळावे असाही जर संयोजकांचा हेतू असेल तर तो चांगल्या प्रमाणात साध्य झाला आहे.

वस्तुसंग्रहालयाच्या कुमार स्वामी सभागृहातील ह्या प्रदर्शनाच्या जवळच जहांगीर कलादालनात अश्विन मेहता या एका हौशी छाया-चित्रकाराने 'जिवंत झाडे' या नावाचे वृक्ष-छायाचित्रांचे एक रम्य प्रदर्शन भरविले आहे. दृष्टी असेल त्याला गुलबक्षीच्या चिमुकल्या रोपट्यापासून भव्य-भव्य देवदारापर्यंत सारी झाडे रमणीय वाटतात. निसर्गाच्या या आविष्काराची अश्विन मेहता यांनी टिपलेली छाया-चित्रे बघितल्यावर सामान्य दैनंदिन जीवनात आपण कलादृष्टी कशी हरवून बसतो याची जाणीव होते.

मेहतांची छायाचित्रे जशी कलात्मक आहेत तशीच बघणाऱ्याच्या मनावर एक गूढरम्य परिणाम साधण्यासही ती समर्थ आहेत. शिवाय मेहतांच्या या प्रदर्शनात दृश्य निवडताना त्यांनी दाखविलेला चोखंदळपणाही नजरेत भरतो. छाती दडपून टाकतील अशा भव्य वृक्षांच्या आडदांड बुंध्यांची अगदी जवळून घेतलेली छायाचित्रे जशी इथे आहेत तशीच दाट पानांच्या जाळीची नाजूक छायाचित्रेही आहेत. एका बाजूला शिस्तीत कापलेलं गवत नि दुसरीकडे वेडेवाकडे वाढलेले झाडांचे बुंधे किंवा एका बाजूला शांत विस्तीर्ण वाळवंट, त्यावरच्या सूक्ष्म रेघांसह नि दुसरीकडे वाऱ्यासह हेलकावणारी नारळीची झाडे अशी किंचित विरोधाभास दर्शविणारी आकर्षक रचनाही त्यांच्या कॅमेऱ्याने टिपली आहे. नेहमी पाहतो तशीच काही निसर्गचित्रेही या प्रदर्शनात आहेत; पण आपल्या वेगळेपणाने ती विशेष आकर्षक झाली आहेत.

अश्विन मेहतांनी प्रदर्शनाची मांडणीही कलात्मकतेने केली आहे. प्रदर्शनाच्या मध्यभागीच

**ज्यांची हृदये झाडांची**
**त्यांनाच फक्त फुले येतात**

ही पाडगावकरांची कविता उद्धृत करून मेहतांनी विशेष औचित्य दाखविले आहे.

मुंबईत भरलेले तिसरे प्रदर्शन हे आणखीनच वेगळे आहे. अपंगां-साठी काम करणाऱ्या स्वस्तिक सोसायटी ऑफ इंडियाच्या मुंबई-तील विद्यालयातील विद्यार्थ्यांनी हे प्रदर्शन सादर केले आहे. प्रदर्शनात शोभेच्या वस्तूंची भाऊगर्दी आहे; पण या वस्तूंच्या निर्मितीत दिसणारी कलादृष्टी, रंगसंगतीत आणलेले नाविन्य आणि एकूण कामात दिसणारा नीटसपणा पाहिल्यावर ह्या वस्तू अपंग, लुळ्या अशा छोट्या-मोठ्या कलाकारांनी तयार केल्या असतील यावर क्षणभर विश्वासच बसत नाही.

एखाद्या शारीरिक किंवा मानसिक अपघातामुळे जीवघेण्या पराव-लंबित्वात सापडलेली ही लहान मुले, अशक्त पण आपल्या स्वतःच्या पायांवर उभे रहाण्यासाठी जी धडपड करतात ती विस्मयकारक आहे; पण असे उभे रहाण्याची जिद्द एकदा या मुलांमध्ये निर्माण झाली की रंगीबेरंगी भेटकार्डे तयार करण्यापासून वेल्डिंग, ड्रीलिंग अशी तुलनेने अवघड अभियांत्रिकी कामे करण्यापर्यंत सर्व काही ही मुले करू शकतात.

गेली अनेक वर्षे अशा मुलांसाठी काम करणाऱ्या मुंबईतील स्वस्तिक सोसायटी या संस्थेने या मुलांना शिक्षणानंतर कायम उपजीविकेचे साधन शोधून देण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत. अभिनेत्री नर्गिस दत्त, उद्योगपती हरीष महिन्द्र अशा नामवंत, धनवंत व्यक्ती संस्थेच्या आधारस्तंभ आहेत. अपंग मुलांची योजना-बद्ध पहाणी करून या संस्थेने अशा मुलांना काम मिळवून देण्यासाठी एक कार्यशाळा उघडण्याचे ठरविले आहे. इंजेक्शन मोल्डिंग, लेथ, वेल्डिंग अशी सोपी यांत्रिक कामे या मुलांकडून करवून घेण्याचा या संस्थेचा विचार आहे. सध्या या संस्थेच्या विद्यालयात मातकाम, कागदकाम, विणकाम, शिवणकाम इ. चे प्रशिक्षण दिले जातेच.

दहा लक्ष रुपये भांडवल गुंतवून ही संस्था अशी कार्यशाला उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेत आहे. या कार्यशालेतील उत्पादनांना बाजारात सतत मागणी असावी यासाठीही एक योजना संस्थेने तयार केली आहे.

आगामी वर्ष उभ्या जगात बालकवर्ष म्हणून साजरे होणार आहे. या वर्षात बालकांच्या सकस आहाराच्या, वगैरे योजना राबविल्या जाणार आहेत. त्याचबरोबर अशा अपंग मुलांच्या पुनर्वसनासाठीही काही निश्चित योजना आखणे आवश्यक आहे.

स्वास्टिक्स सोसायटी व तिच्या संलग्न संस्थांचे फायदे मुंबईत रहाणारी अशी अपंग बालके जरूर घेत आहेत; पण या अशा संस्थांचा प्रसार, निदान अस्तित्वात असलेल्या संस्थांची माहिती तरी ग्रामीण भागापर्यंत पोहोचेल याकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे. अन्यथा अशा संस्था अकारणच काही श्रीमंत अपंगांची मिरासदारी बनतील. त्याहीपेक्षा, सोय असूनही पंगुत्वाच्या दुर्दैवी फेऱ्यातून बाहेर न पडणारी ग्रामीण भागातील मुले या संस्थांच्या फायद्यांपासून वंचित राहतील हे जाणीवपूर्वक टाळले पाहिजे.

# क्षिप्रा नदीच्या तीरावरून...

जनता पक्षाच्या पहिल्या राष्ट्रीय शिबिरासाठी आम्ही १४ नोव्हेंबरच्या सकाळी उज्जैनला पोहोचलो. प्रत्यक्ष शिबिराचं ठिकाण उज्जैन शहरापासून ११ कि. मी. अंतरावर कालिया देह महाल या ठिकाणी होतं. हा महाल शिंदे राजघराण्याचा होता. सध्या विजयाराजे शिंदे यांनी एका विश्वस्त कंपनीकडे त्याची जबाबदारी दिली आहे. या राजमहालाच्या परिसरातच एका विस्तीर्ण मैदानात छोटे छोटे तंबू उभारून शिबिरार्थींची रहाण्याची सोय करण्यात आली होती. या साऱ्या परिसराला आणीबाणीत, कारावासातच मृत्यू पावलेल्या हसमत वारसी या कार्यकर्त्याच्या स्मरणार्थ हसमत वारसीनगर असं नाव देण्यात आलं होतं.

शिबीर-स्थानाचाच विषय आहे म्हणून त्याबद्दल ऐकलेलं थोडंसं सांगतो नि मग शिबिराकडे वळतो. शिंदे-राजघराण्याचा हा एकमजली महाल १५ व्या शतकात तिसऱ्या नासिरुद्दिन खिलजीने बांधून काढला. युद्धातील विजयानंतर क्षिप्रा नदीच्या तीरावर दिमाखात उभा असलेला हा महाल शिंदे घराण्याकडे आला खरा; पण शिंदे घराण्याच्या वैभवाऐवजी दुःखातच त्यांमुळे भर पडली. कारण दोन–तीन प्रसंग असे घडले की, ज्यामुळे शिंदे घराण्यातील व्यक्ती संध्याकाळी पाचनंतर या महालात झोपली तर ती पुन्हा उठत नाही, अशी दंतकथा रूढ झाली. आजही विजयाराजे शिंदे इथे येतात; पण संध्याकाळी पाचनंतर त्या उज्जैनच्या वेशीबाहेर गेलेल्या असतात.

या ठिकाणी भरलेलं जनता पक्षाचं हे पहिलंच राष्ट्रीय शिबीर होतं. कार्यकर्ता-शिबीर असं या शिबिराला संबोधण्यात आलं होतं; पण प्रत्यक्षात उपस्थित होते ते फक्त निवडक तीनशे नेते. काही निवडक खासदार, आमदार आणि जनता पक्षाच्या राज्यशाखांचे प्रत्येकी पाच पदाधिकारी या शिबिराच्या निमंत्रितांच्या यादीत होते. याशिवाय सर्व जनता मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य इ. मंडळीही अपेक्षित होती.

१४ तारखेला संध्याकाळी चंद्रशेखरांच्या हस्ते ध्वजारोहण झालं आणि शिबिराच्या कामकाजाला सुरुवात झाली. चंद्रशेखर सुमारे एक तास अगदी पोटतिडिकीने बोलले. सरकारच्या अपयशावर त्यांनी सडेतोड टीका केली. या गाजलेल्या भाषणाचा वृत्तान्त पूर्वीच प्रसिद्ध झाला आहे. त्यामुळे त्याचे विस्तृत विवरण देण्याची गरज नाही; पण चंद्रशेखरजींनी पक्षातील अंतर्गत भांडण, राज्यसरकारांचे अपयश, भाषाभेद व जातिभेदावरून होणारे तंटे आणि अभिवचने पाळण्यात आलेल्या अपयशामुळे निवडणुकीत होणारे पराभव अशा सर्व मुद्द्यांचा तिखट शब्दांत परामर्श घेतला. बोलण्यातली आक्रमकता आणि एकूण आशय असा होता की, तिन्हाइताला समोरचा वक्ता सत्ताधारी पक्षाचा अध्यक्ष आहे, की विरोधी पक्षनेता आहे असा संभ्रम पडावा.

चंद्रशेखरांच्या भाषणाचे पडसाद उमटले, तेही विविध रंगी. साधारणपणे भा. लो. द. आणि समाजवादी गोटातून त्यांच्या भाषणाचं जोरदार स्वागत झालं. मात्र ते होण्यामागे आत्मपरीक्षण व्हावे यापेक्षा नेतृत्वात बदल घडून यावा ही सुप्त इच्छाच होती, हे वेगळं सांगावं लागू नये.

बहुसंख्य माजी काँग्रेसजन भाषणाबद्दल काहीसे नाखूष होते. अनेकजणांना सरकारच्या कामातील चांगल्या गोष्टींची उपेक्षा झाली असे वाटत होते. जनसंघीयांची प्रतिक्रिया मध्यममार्गी होती. सुंदरसिंग भंडारींसह अनेकांनी या भाषणावर मौन धारण करणंच पसंत केलं.

या भाषणाबरोबरच १४ तारखेचे कार्यक्रम संपले. १५ तारखेला दोन वेगवेगळ्या गटांत चर्चासत्राचे कार्यक्रम होते. 'अ' गटात सरकारी प्रशासन व तत्संबंधी उपविषयावर चर्चा झाली. या गटाचे निमंत्रक होते, जनता संसदीय पक्षाचे सरचिटणीस डॉ. मुरली मनोहर जोशी, श्री. दिग्विजय नारायण सिंह आणि श्री. इरा सेझियन. दुसऱ्या म्हणजे 'ब' गटांत पक्ष व संघटनात्मक बाबींवर विचार झाला. त्याचे संयोजक होते हेमवतीनंदन बहुगुणा आणि खा. सुरेंद्र मोहन.

चर्चेसाठी दोन गट पाडले होते खरे; पण एकूण चर्चा विस्कळित होऊ नये म्हणून चर्चेत कोणते मुद्दे उपस्थित व्हावेत याबाबत एखादे प्रारूप तयार करण्याची गरज होती. अपेक्षेप्रमाणे 'अ' गटात (प्रशासकीय प्रश्नांवरील) झालेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी उपस्थितांपैकी बरेचजण उत्सुक होते. बोलणाऱ्या सदस्यांची यादी पाहता हे लक्षात येते की, माजी समाजवाद्यांपैकी बहुसंख्य सरकारवर तुटून पडण्यात अग्रेसर होते. सदाशिव बागाईतकर, मृणाल गोरे, शरद यादव इ. सर्वांनीच सरकारी अपयशाबद्दल नेतृत्वाला जबाबदार धरले. यांच्यापैकी अनेकांनी मोरारजींना काढून टाकणे हाच सर्व समस्यांवर एकमेव उपाय असल्याचे कोणताही आडपडदा न वापरता ठणकावून सांगितले. बागाईतकरांनी मोरारजींची हुकुमशहा म्हणून निर्भर्त्सना केली तर यादव, रामधनप्रभृतींनी सर्वच आघाड्यांवर केंद्र सरकारला अपयश आल्याचे सांगितले. सरकारच्या काही धोरणामुळे आपला पक्ष भांडवलदारांचा पक्ष म्हणून ओळखला जात आहे, याबद्दल श्रीमती मृणाल गोरे यांनी चिंता व्यक्त केली. श्रीमती गोरे, शरद यादव इ. सर्वांनीच औद्योगिक संबंध विधेयकावर कडाडून टीका केली. बंगालचे डॉ. दिलीप चक्रवर्ती यांनी अलिगढ व अन्य जातीय दंगलीत काँग्रेस (आय)चा हात आहे काय, याची चौकशी करण्याची मागणी केली.

कृषिराज्यमंत्री भानुप्रताप सिंग यांना या चर्चेत अनेक शाब्दिक चकमकींना तोंड द्यावे लागले. चर्चेत भाग घेणाऱ्या अनेकांनी शेतीमालाचे भाव वाढविण्यास सरकार तयार नसल्याबद्दल खेद व्यक्त केला. एक जण म्हणाला की, औद्योगिक उत्पादनाचे भाव भरमसाठ वाढत असतात; पण कृषि-उत्पादनांना मात्र वाजवी किंमत मिळणेही मुश्किल होते. याचा समाचार घेताना भानुप्रताप सिंग म्हणाले की, औद्योगिक व कृषि उत्पन्नांच्या भावात समतोल हवा हे शासनाला तत्त्वतः मान्य आहे; पण छोटा शेतकरी हा उत्पादक असतो, तसाच त्याहीपेक्षा अधिक, तो एक ग्राहक असतो याचाही विचार व्हायला

पृष्ठ २३ वर

सख्ख्या नातेवाइकांनासुद्धा मी पटवून देऊ शकत नाही. मग दूरच्या लोकांची काय कथा?

# चोचीं तितका चारा

कविता गुपचुप

सकाळी-सकाळीच मी मागच्या हौदातला नळ बंद करायला गेले. नळाजवळ एक डोमकावळा बसला होता. मी जवळ गेले तरी तो उडालाच नाही! मग माझ्या लक्षात आलं, ते कावळ्याचं पिल्लू आहे. नळ बंद करताना ते दोन पावलं दूर सरकलं. मग पुढच्या हौदातला नळ बंद करायला मी गेले. ते पिल्लू मधूनच पळत, मधूनच फूटभर उंचीवर उडत पुढल्या अंगणात आलं. तोवर दोन-चार कावळे कावकाव करीत आलेच. त्यांना हाकललं आणि मग पाणी भरता भरता पुढच्या अंगणातल्या पिल्लावर मी लक्ष ठेवून राहिले. इतर कावळे त्याला मारतील अशी मला भीती वाटत होती. एखाद्या टोपल्याखाली त्याला झाकून ठेवावं की काय, असा मी विचार करीत होते. त्याला वाचविण्याचा दुसरा कुठलाच उपाय मला सुचत नव्हता. ५-१० मिनिटांत माझं काम संपलं. मग मी पिल्लाला बघायला गेले. पुढच्या अंगणात ते नव्हतं. मागच्याही अंगणात नव्हतं. उडून गेलं की काय? मग मी उजव्या बाजूला त्याला शोधत गेले आणि समोरच मला ते दिसलं. चिक्कूच्या झाडाखाली. पंख थोडे पसरले होते. मान कलली होती. कुठे जखम नाही, कुठे रक्त नाही; पण खेळ संपला होता! वाईट वाटलं आणि आश्चर्यही. कुठलंच शरीरशास्त्र न शिकलेले हे कावळे पण एका चोचीत प्राण घेतला त्या पिल्लाचा. कुठून माहिती मिळाली यांना? पण कावळ्यांनाच काय इतरही प्राण्यांना, पक्ष्यांना इतकी साधी गोष्ट माहीत असते. हीच काय, इतरही किती तरी गोष्टी त्यांना माहीत असतात. का मारलं असेल त्या पिल्लाला? कारण एकच होतं. त्याला नीट उडता येत नव्हतं; पण एवढंसं कारण प्राण जायला पुरेसं आहे का? त्याला काय चार-दोन दिवसांत उडता आलं नसतं? पण दुर्बल घटकांना या जगात जगण्याचा अधिकारच नाही त्यांच्या लेखी, असाच त्यांचा नियम असावा. केवळ सशक्त, सर्वच दृष्टीनं चांगले असलेल्या कावळ्यांनाच तो अधिकार असावा. म्हणूनच तर त्यांची प्रजा चांगली निपजते. दुर्बल, रोगी अशी ती सापडणार नाही. कनिष्ठाला तिथं जागाच नाही. त्यामुळे प्रजा चांगली तर होतेच आणि प्रजेची वाढही मर्यादित होते.

असं माणसाच्याबाबतीत घडतं तर? त्यानं अशा मुलांसाठी सतरा डॉक्टरांचं औषध आणलं असतं. त्याची डोळ्यात तेल घालून काळजी घेतली असती. तळहाताच्या फोडासारखं त्याला जपलं असतं आणि आई-बापांनी हृदयातलं सारं प्रेम त्याच्यावर ओतलं असतं. म्हणूनच कावळ्याचं असलं कृत्य बघून, 'काय मेले कावळे, काय दुष्टपणा, मेल्यांना माणुसकी कशी ती नाहीच. पोटचा गोळा सुद्धा मारून टाकतात!' असं आम्ही माणसं म्हणतो.

मला तर वाटतं, या माणुसकीनंच माणसाचं भयंकर नुकसान केलंय. नको तिथं तिच्या पोटात दया उत्पन्न होते आणि हवी तेव्हा ती गायब होते. रोगी, दुबळा, लंगडा, पांगळा, वेडा, दरिद्री, हिडीस कुठल्याही माणसाला या जगात जगण्याचा अधिकार आहे, इतपत सुद्धा ठीक आहे. शेवटी माणसं, पक्षी किंवा प्राणी होऊ शकणार नाहीत; पण या असल्या लोकांना प्रजा निर्माण करण्याचा आणि तीसुद्धा हवी तितकी निर्माण करण्याचा अधिकार या माणुसकीनं दिला आहे. हे लोक आपल्यासारखीच किंबहुना आपल्याहून वाईट प्रजा निर्माण करून सगळ्या मानवजातीचं नुकसान करून ठेवतात, याची कुणाला दखलच नाहीये. असल्या लोकांचं सक्तीनं निर्बीजीकरण केलं पाहिजे, असं नुसतं म्हटलं तरी अनेकांना त्यांचा कळवळा येईल. तुम्हाला जशा भावना आहेत, तशा त्यांनाही आहेत हेही ऐकवलं जाईल. ते असे आहेत हा काय त्यांचा दोष? दोष नशिबाचा असेल, समाजाचा असेल म्हणून त्यांना का ही शिक्षा, हेही सुनावलं जाईल. निसर्गानं दिलेला अधिकार हिरावून घ्यायचा तुम्हाला काय अधिकार? असा जाबही विचारला जाईल आणि तोही माणुसकीच्या तोऱ्यात; पण हेच ते लोक, दारावरच्या भुकेनं मरणाऱ्या भिकाऱ्याला काहीही देणार नाहीत, आजारानं रस्त्यातच पडलेल्या भिकाऱ्याकडे डोळा उचलून साधी नजरही टाकणार नाहीत, कचरापेटीत गाई, कुत्री, मांजरं, कावळे, चिमण्या यांच्या बरोबरीनं अन्न शोधणाऱ्या चिमुकल्या मुलांची यांना कीव येणार नाही. हीच तर आमची माणुसकी! केवळ जन्म देण्यापुरती आठवणारी. जन्म दिला की संपणारी! असली माणुसकी नसलेलीच बरी. निदान या जीवांना जन्म तरी मिळणार नाही. जनावरांप्रमाणे जगणाऱ्या या माणसांना माणूस तरी का म्हणायचं? केवळ माणसासारखं शरीर आहे म्हणून? पण माणसाचं माणूसपण काय केवळ शरीररचनेतच आहे? माणसाला बुद्धी नावाची एखादी गोष्ट असावी लागते याचाही त्यांना पत्ता नसेल. असली माणूसरूपी जनावरंच म्हणायची. आधीच लोकसंख्या अफाट असलेल्या या देशात, असल्या माणसांची भर पडून, आधीचेच कठीण असलेले प्रश्न अधिक बिकट होतात. कमी मुलं असावीत हा विचार करतात सुशिक्षित, पैशानं बरे असलेले लोक; पण या असल्या लोकांच्या बाबतीत प्रश्नच उद्भवत नाही. जन्म देण्यापलीकडे मुलांचं ते काहीच देणं लागत नाहीत. त्यांचं शिक्षण, उदरभरण इ. गोष्टी त्यांच्या शब्दकोशातच नसतात. पक्षी-प्राणी यांच्याप्रमाणे मुलांना जन्म द्यायचा आणि ती स्वतःच्या पायावर चालू लागली, बोलू लागली की, त्यांचा रस्ता त्यांनीच शोधायचा. स्वतःचं अन्न स्वतःच मिळवायचं. जो चोच निर्माण करतो तोच चारा निर्माण करीत असतो. तेव्हा त्यांना ज्या अर्थी जन्म मिळालाय त्या अर्थी त्यांची अन्नाची सोय झालेली आहे, असं

त्यांना वाटतं. चोचीसाठी चारा परमेश्वर निर्माण करीत असेलही; पण ज्यांना चोची नसून तोंडं आहेत त्यांचं काय? पक्षी-प्राणी आपली संख्या मर्यादित ठेवून त्या परमेश्वरावर चारा पुरवायची जबाबदारी टाकीत नाहीत. निसर्गाचा समतोल ते ढळू देत नाहीत. काही प्राणी आपल्याच पिल्लांना जन्मतः काही विशिष्ट परिस्थितीत खातात, काही त्यांची हेळसांड करतात, तर आपली संख्या प्रमाणाबाहेर वाढते आहे हे पाहताच काही प्राणी आत्महत्या करतात. माणसासारखी बुद्धी नसलेल्या पक्ष्यांची-प्राण्यांची ही कथा; पण आम्ही माणसं? आम्ही अत्यंत बुद्धिवान म्हणून सर्वांत श्रेष्ठ. आम्ही निरनिराळे शोध लावले. रोगांवर विजय मिळविले. मृत्युसंख्या कमी केली; पण त्यामुळेच लोकसंख्येचा समतोल बिघडतोय हे आमच्या बुद्धीला आकलनच झालं नाही. आयुष्य वाढलं. ठीक आहे; पण त्यामुळे लोकसंख्येचा समतोल ढळू न देता निदान तो अन्य उपायांनी राखला जाईल हे तरी त्या वेळेस पाहायला नको होतं का? आयुर्मर्यादा वाढली तर प्रजनन नियंत्रित करायला नको? ही गोष्ट लक्षात यायला, लक्षात येऊन पटायला, पटून तिचा प्रसार व्हायलाच फार वेळ लागला. केवळ आपल्या देशाचा विचार केला तरी शहारे येतात. भीती पडते, आमच्या मुलांच्या मुलांची गोष्ट सोडायची; पण आमच्या मुलांचं कसं होणार? हा विचार जे करतात, त्यांना पटतं मुलं कमी असावीत. तसा ते प्रयत्नही करतात; पण जेव्हा मुलगा असण्याचा प्रश्न उद्‌भवतो तेव्हा मात्र, बाकी सगळ्या गोष्टी उण्या पडतात. आम्हाला मुलगा हवा, वंशाला दिवा हवा, वारसदार हवा. मग त्यासाठी मुलींची कितीही मोठी रांग लागली तरी हरकत नाही! मला समजत नाही, यांना मुलगा हवा कशाला? हल्लीच्या दिवसांत संपत्ती जमविणं शक्य आहे? आणि असं काय यांच्या घराण्यानं केलेलं असतं, की यांच्या वंशाला दिवा लागलाच पाहिजे? मुली काय यांचं नाव वाढवू शकत नाहीत?

आमच्या ऑफिसातल्या बाई (आजीबाई) मला सांगत होत्या. ‘हल्ली फार बाई दमायला होतं. होत नाही इतकं आता.’ ‘का हो, हल्ली ऑफिसात फार काम असतं का?’—मी. ‘छे ग. घरचं सांगतेय मी. दोन नाती, स्वयंपाक-पाणी सगळं एकटीनंच करायचं.’ —आजीबाई. कारण मला माहीत होतं; पण मी अजिबात विचारलं नाही त्यांना. मला या विषयावर बोलायचीच इच्छा नव्हती. त्या क्षणभर थांबल्या. पाहत होत्या मी काय म्हणतेय. मी काहीच बोलत नाही हे पाहून त्याच पुढे म्हणाल्या, ‘तूच सांग. सुनेला तरी कोणत्या तोंडानं म्हणायचं? इतके कडक डोहाळे लागलेत विचारू नकोस. दोन्ही मुलींच्या वेळेस असं नव्हतं बाई; पण या वेळचं सगळंच निराळंय.’ म्हणजे या वेळेस नक्की मुलगाच असं त्या सुचवीत होत्या. मी म्हटलं, ‘निराळं आहे असं मनानं ठरवलं की, तसंच व्हायला लागतं.’ ‘तुझं आपलं काही तरीच. अग, डोळ्यानं पाहतेय ना मी रोज. रोज सकाळी...’ आजीबाईंचं वाक्य अर्धवट तोडीत मी म्हटलं, ‘हे पहा आजीबाई, तुमच्या सुनेचं हे पहिल्यांदा असतं ना, निदान दुसऱ्यांदा तरी, तरी मी कौतुक केलं असतं. तुमच्या सहा मुलांचा अनुभव लक्षात न घेता, मीच तुम्हाला म्हटलं असतं की, ‘आजीबाई, या वेळेस नक्की पेढे हं. तयारी ठेवा. तुमच्या सुनेची लक्षणंच दिसताहेत हो; पण तिसऱ्यांदा? मी नाही हो कौतुक करणार. सांगून ठेवतेय!’ आजीबाईंना राग आला. ‘सुरुवातीलाच मुलगा झाला असता, म्हणजे मग काही प्रश्नच नव्हता. बाकी तुला काय सांगायचंय म्हणा. स्वतःला मुलगा नाही.’ जणू काही माझ्यावर घाव घालण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मी म्हटलं, ‘माझ्या बहिणीला मुलगेच आहेत. लोक तिला म्हणतात, ‘स्वतःला झालेत ना मुलगे? मग दुसऱ्याला उपदेश करायला काय होतंय?’ अहो, लोक काय, दोन्ही तोंडानं बोलतात!’ आता मात्र आजीबाई खूपच भडकल्या, ‘अस्सं का? म्हणजे मी दुतोंडी आहे म्हणेनास? एकदाचं म्हणून टाक ना, तुला काय म्हणायचं ते!’ ‘यापुढे तुमच्या तिसऱ्या किंवा इथून पुढे होणाऱ्या नातवंडांचं कौतुक एकदम बंद!’ मी म्हटलं.

एक वेळ आजीबाईंनी ‘मुलगा, मुलगा’ केलेलं ठीक आहे. संसार चालण्याइतका पैसा आहे. सर्वसाधारणपणे शिक्षण देण्याची ऐपत आहे; पण या मुलाचा रोग वरपासून खालपर्यंत आहे. आमची भांडेवाली. २५ वर्षांची असेल फार तर. नवरा बेकार. दारुडा. मारकुटा. पाठोपाठ तीन मुली. मग मुलगा झाला. एकदाचा वंशाला दिवा लागला. म्हटलं, ठीक आहे. आता तरी ऑपरेशन करून घेईल; पण नाही. नवऱ्याची परवानगी नाही. तीन मुलींच्या पाठीवर झालेल्या मुलाला म्हणे धोका असतो. तेव्हा अजून एक मुलगा हवा. लगेचच होईल याची गॅरंटी अजिबात नाही. ठीक आहे. तोपर्यंत कारखाना चालू राहील. बिचारी आमची भांडेवाली. दहा घरची धुणं-भांडी. पोरं. आजारपण. शाळा आणि नवरा. आणि हा


**आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा**
**वेगळा शोध**

**स्पष्ट, परखड आणि प्रामाणिक**

# जनांचा प्रवाहो चालिला

**लेखक : विनय हर्डीकर**

**किंमत : वीस रुपये**

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

नवरा ? घरात बसून वंशाचे दिवे पाजळतोय.

हा ' मुलग्याचा रोग ' सुशिक्षित मंडळींना सुद्धा लागतो, तेव्हा माझा संताप अनावर होतो. माझ्या माहितीच्या एक बाई आहेत. स्वत: Post-graduate आहेत. ओळीनं पाच मुली झाल्या. आता म्हणे त्यांच्या मनावर (की डोक्यावर) परिणाम झालाय मुलगा नाही म्हणून. मुलगा व्हावा म्हणून अंगारे-धुपारे करणाऱ्या, नवस बोलणाऱ्या, डॉक्टर-वैद्यांचं औषध घेणाऱ्या, घरगुती काढे आणि वैदूंची औषधं घेणाऱ्या, या सगळ्यात शिकलेल्या महिला आघाडीवर असलेल्या दिसून येतात. अशीच माझी एक सुशिक्षित, बुद्धिवादी मैत्रीण. तिला किती समजावलं, दोन्ही मुली तर मुली. मुलात काय विशेष आहे ? पण बाई जाम ऐकायला तयार नाही. स्वतःचा भाऊ. डोळ्यांनी पाहतेय आई-वडिलांना कशा लाथा घालतोय आणि ती स्वत: ? वेगळी राहतेय नवऱ्याला घेऊन.

हल्लीच्या या सुशिक्षित, तरुण मुलींची ही विचारसरणी. मग म्हाताऱ्या माणसांनी ' मुलगा, मुलगा ' केलं तर नवल काहीच नाही. माझी आई नेहमी म्हणते, ' हे बघ, बहिणीला भाऊ हवाच. बाकीचं मला काही सांगू नकोस! ' तिला मी सांगण्याचा प्रयत्न करते, 'लोकसंख्या फार वाढलीय, या नवीन मुलांचा निभाव लागणं शक्य नाही दिवसेंदिवस. ' यावरही तिचं उत्तर आहेच. ती म्हणते, ' तू एकटीनं काळजी करून काय होणार ? जे इतरांचं तेच आपलंही आणि उगीच काळजी तरी कशाला करायची ? जो चोच निर्माण करतो तोच चाराही निर्माण करतो ! '

ही झाली म्हातारी पिढी; पण यापुढच्या पिढीचं मत असंही आहे, ' लोकसंख्या वाढू द्यायची नाही वगैरे ठीक आहे; पण याबाबतीत निसर्ग स्वतःच नियंत्रण ठेवत असतो. आता सध्याच पहा ना, भूकंप होतात आणि हजारो माणसं मरतात! ' आपण आधी बेजबाबदारपणे वागायचं आणि निसर्गाला अशा तऱ्हेनं नियंत्रण करायला लावायचं ! अजब तर्कशास्त्र आहे !

औषध घेऊन आपण आपलं आयुष्य वाढवलंय. निसर्गनियमाच्या विरुद्ध आपण वागून त्याचा समतोल बिघडवला. तेव्हा अन्य उपाय योजून तो समतोल आपल्याला राखलाच पाहिजे. शेवटी निसर्गाला मर्यादा आहेत आणि तो आहे म्हणून आपण आहोत. लोकसंख्येला आळा घालण्यावाचून गत्यंतर नाही. मला याबाबत काही उपाय सुचतात.

१) दोन मुलांनंतर सक्तीचं ऑपरेशन.

२) रोगी, विशेषत: ज्यांना आनुवंशिक असलेले रोग झाले आहेत असे, शारीरिकदृष्टया व्यंग असलेले, मानसिक तोल सुटलेले यांना मुलं असण्याचा अधिकार असू नये.

३) ज्यांना स्वतःचा संसार चालवण्याचो ऐपत नसेल असे दरिद्री, भिकारी यांनाही मुलं होऊ नयेत.

४) अत्यंत हिडीस असणाऱ्यांना मुलं होऊ नयेत.

५) नोकरी करणाऱ्या बायकांना बाळंतपणाची ३ ते ४ महिन्यांची बिनपगारी सक्तीची रजा असावी. म्हणजे मग पहिलं असो नाही तर दुसरं, मूल होणं त्या लांबणीवर टाकतील.

६) शैक्षणिक पात्रतेच्या प्रत्येक सर्टिफिकेटवर कितवा मुलगा / मुलगी यांची नोंद असावी. पहिल्या, दुसऱ्या मुलाला/मुलीला शिक्षणात, नोकरीत अग्रक्रम द्यावा.

७) आर्थिक कुवत लक्षात येण्यासाठी लग्न करणाऱ्या प्रत्येक मुलाला आणि मुलीला ठराविक रक्कम पोस्टात गुंतविण्याची सक्ती असावी. ही रक्कम त्यांना निवृत्तीनंतर परत मिळावी.

पैशानं, बुद्धीनं दरिद्री असणाऱ्यांनाच अधिक मुलं होतात हे कटू सत्य आहे. अशानं देशात याच लोकांची अधिक भरती होत रहाते. याच्यावरसुद्धा उपाय शोधले पाहिजेत.

अत्यंत बुद्धिवान असणाऱ्या मुला-मुलींची लग्नं लावण्याचा प्रयत्न करायला हवा. पूर्वीच्या काळी राजपुत्रासाठी/राजकन्येसाठी, अनुरूप जोडीदारासाठी इतर राज्यातही शोध घेतला जात असे. तसे प्रयत्न बुद्धिवानांसाठी जरूर करायला हवेत. अशा दांपत्याला जास्त मुले होण्याची परवानगी असावी. नव्हे त्यांना जास्त मुले व्हावीतच. अशा तऱ्हेने देशाची लोकसंख्या कमी करतानाच बुद्धिवान, सुदृढ, सुंदर अशी जास्तीत जास्त प्रजा निर्माण करण्याकडे लक्ष द्यावे.

मला माहीत आहे, माझी मतं कुणाला अव्यवहार्य वाटतील. ठीक आहे. त्यातला अव्यवहारीपणा टाकून ती व्यवहारी करून घ्या. कुणाला वेडेपणाची वाटतील. त्यातील वेडेपणा टाकून शहाणपणाचा भाग घ्या. कुणाला ती टाकाऊ वाटतील. ठीक आहे. ती टाकून द्या; पण तुम्ही उपयोगी मतं सुचवा. निदान विचार करा. अगदी ताबडतोब !

माझी मैत्रीण म्हणते, माझी मतं मी इतरांना का सांगत नाही, पटवून देत नाही ? मी सांगणार ? मी काय सांगणार ? आणि कोणाला ? रोज येणाऱ्या मोलकरणीला, दारावरच्या भिकारणीला, जवळच्या मैत्रिणींना, सख्ख्या नातेवाइकांनासुद्धा मी पटवून देऊ शकत नाही. मग दूरच्या लोकांची काय कथा ? पण मासिकांतून, वर्तमानपत्रांतून लोकसंख्येच्या या भस्मासुराच्या कथा वाचून अंगावर काटा येतो, पोटात गोळा उठतो, छातीत धस्स होतं ! डोळ्यांपुढं अंधेरी येते. डोक्यात विचार येतो, कसं होणार माझ्या मुलींचं ? मी तरी काही करू शकत नाही. मला उपाय सापडतो. मीही इतरांसारखी होते. असले लेख वाचायचे नाहीत. कोणी या विषयावर बोललेलं ऐकायचं नाही. ऐकू आलंच तर स्वतःचं समाधान करायचं, मी काय एकटी आहे या जगात ? जे इतरांचं तेच माझं. ठेविले अनंते तैसेची रहावे आणि मुळात काळजीच कशाला करायची ? जो चोच निर्माण करतो, तोच चाराही निर्माण करतो ! □

# आगाऊ कर – १५ डिसेंबर

- ☐ आगाऊ कराचा पुढील हप्ता जमा करण्याची अखेरची तारीख १५ डिसेंबर आहे. त्यापूर्वी हप्त्यांची रक्कम रिझर्व बँकेत अथवा स्टेट बँकेत आणि त्यांच्या आश्रित बँकेत अथवा सार्वजनिक क्षेत्रातील अधिकृत बँकेत जमा करा. त्यासाठी कंपनी असल्यास आयटीएनएस ३५ ए फॉर्म आणि इतरांनी आयटीएनएस ३५ फॉर्म वापरावयाचा आहे.

- ☐ कृपा करून खालील गोष्टी लक्षात ठेवा :

  (अ) ज्यांची ७५ टक्के अथवा अधिक प्राप्ती, अशा व्यवसायांतून होत असेल, ज्यांचे हिशोबाचे वर्ष ३१ डिसेंबर अथवा त्यापूर्वी संपत असेल त्यांच्यासाठी हा अखेरचा हप्ता आहे.

  (ब) इतरांसाठी हा दुसरा हप्ता आहे.

- ☐ जर आपण आगाऊ कराचा तपशील फॉर्म नं. २८ ए वर अथवा अंदाज फॉर्म नं. २९ वर भरून, अजून दाखल केला नसेल आणि १५ जून अथवा १५ सप्टेंबरपूर्वी भरावयाचा आगाऊ कराचा हप्ता भरला असेल तर त्या स्थितीत :

  आपण 'अ' श्रेणीत असाल तर, १५ डिसेंबरपूर्वी एका हप्त्यात बाकी सर्व आगाऊ कर भरून, आपण वरील फॉर्म दाखल केला आहे आणि जर 'बी' श्रेणीत असाल तर बाकी आगाऊ रक्कम दोन सारख्या हप्त्यांत, १५ डिसेंबर आणि १५ मार्चपूर्वी जमा करीत आहात,

  **ही खात्री करून घ्या**

- ☐ आपण आगाऊ अंदाज केलेल्या रकमेपेक्षा जर आपली प्राप्ती ३३⅓ टक्के अधिक होणार, असे आपणास वाटत असेल तर, आपण सुधारित अंदाज दाखल करणे आवश्यक आहे. तसेच (पूर्वीचा अंदाज अधिक होता असे आपणास वाटत असेल तर सुधारित) अंदाज दाखल करून, त्याप्रमाणे कमी कर जमा करण्याची सवलत आपणास आहे.

## लक्षात ठेवा

१. प्राप्तीकर अधिकाऱ्यांकडून आदेश येण्याची वाट पाहू नका.
२. आगाऊ कराचा सुधारित अंदाज आताच पाठवा आणि त्याप्रमाणे आगाऊ कर जमा करा.
३. आपल्या प्राप्तीच्या अंदाजात भांडवली नफा, घोड्यांच्या शर्यती, लॉटरी, भाग्य-सोडती आणि शब्द-कोडी यांपासून झालेल्या प्राप्तीचा समावेश करू नका.

आपल्या एकंदर प्राप्तीने खालील मर्यादा ओलांडल्यास, आपण आगाऊ कर जमा केला पाहिजे.

| | |
|---|---|
| (१) कंपनी अथवा प्राधिकरण | रु. २,५०० |
| (२) रजिस्टर्ड फर्म (व्यापारी संस्था) | रु. ३०,००० |
| (३) इतर | रु. १०,००० |

---

**व्याज आणि भुर्दंड टाळा : वेळेवर आगाऊ कर भरा**

---

निवेदक

**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन**

(रिसर्च, स्टेटिस्टिक्स अँड पब्लिकेशन्स)

**इन्कमटॅक्स डिपार्टमेंट**

नवी दिल्ली–११०००१

davp 78/332 (Marathi)

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरंदरे

# बगावतमें ताज टूटे यह भी तुम्हें याद होगा।
# बगावतमें ताज बने यह भी तुम्हें याद होगा॥

तर इराण पेटलेला आहे. श्वेतक्रांती यशस्वी झाल्याचा परवापर्यंतचा शहाचा नारा रस्तोरस्ती भडकलेल्या आंदोलनात लुप्त झालेला आहे. अडीच हजार वर्षांचा दैदीप्यमान वारसा सांगणाऱ्या पहलवी घराण्याची अडीच दशकांची राजवट आज संपते का उद्या, इतपत अस्थिर झालेली आहे.

प्रमुख कारणे तीन आहेत. पहिले म्हणजे एकाधिकार. एकाच व्यक्तीच्या हातात सत्ता एकवटल्याचे सरळ दुष्परिणाम. त्यातूनच इराण शियापंथीय. शियापंथाची मुस्लिम राजवट असणारे जगातले ते एकमेव समर्थ राष्ट्र. मुल्ला आणि मौलवी यांचा इस्लामी जगतावर नेहमीच मोठा पगडा राहिलेला आहे. प्रचंड वेगाने पसरणाऱ्या आणि झिरपणाऱ्या श्वेतक्रान्तीला आजवर विरोध न करता आल्याची खळबळ आतापर्यंत साठत आली. औद्योगिक प्रगतीचा वेग जबरदस्त वाढला; पण पाश्चात्यीकरण खऱ्या अर्थाने झाले नाही. मदिरागृहे, जुगारी अड्डे, नाइट क्लब्ज् या रंगेलपणालाच पाश्चात्यीकरण म्हणण्याइतपत वेळ आली आणि या वातावरणात वाढलेल्या नव्या पिढीची अवस्था धड ना मुस्लिम, धड ना पाश्चात्य अशी झालेली आहे. पाश्चात्य जीवनाची वैज्ञानिक बैठक तयार होण्यासाठी पंचवीस वर्षे हा शहाचा काळ फारच कमी होता. त्यात भर ब्रिटिश आणि अमेरिकन तंत्रज्ञांनी टाकली. रक्तातच कुटिल व्यापार मुरलेल्या ब्रिटिशांबद्दल त्यामुळेच अमेरिकनांइतकीच तीव्र घृणा आजच्या इराणमध्ये आढळते.

**पार्श्वभूमी :** १६ सप्टेंबर १९४१ ला इराणचा त्या वेळचा शहा पदच्युत झाला; पण जाता जाता आपल्या २१ वर्षांच्या सर्वांत मोठ्या मुलाला सिंहासनावर आरूढ करून तो गेला. ते दुसऱ्या महायुद्धाचे दिवस होते. काही काळ अस्थिरतेत गेल्यानंतर युरोपात शिक्षण झालेल्या या मोहम्मद रेझा पहलवीने हळूहळू स्थान बळकट केले आणि तो इराणचा अभिषिक्त सम्राट झाला. १९५१ पर्यंत अँग्लो-इराणियन ऑइल कंपनी [ AIOC ] ही ब्रिटिश कंपनी इराणमधून काळे सोने उपसत होती. सप्टेंबर १९५१ मध्ये नॅशनल इराणियन ऑइल कंपनीने [ NIOC ] तिची जागा घेतली. अखेरचा ब्रिटिश या कंपनीतून बाहेर गेला आणि खऱ्या अर्थाने शहाच्या राजवटीला सुरुवात झाली. कारण संपूर्ण अर्थव्यवस्था पेट्रोलियमच्या निर्यातीवर आधारित होती आणि अजूनही आहे त्या दृष्टीने हा १९५१ चा उत्तरार्ध महत्त्वाचा होता. सरकारी खजिना राष्ट्रीय मालमत्तेने प्रचंड प्रमाणात भरला जायला सुरुवात झाली. १९५९ च्या डिसेंबरमध्ये शहाने सोराया या त्याच्या दुसऱ्या पत्नीशी घटस्फोट घेऊन राजकन्या फारा दिबा हिच्याशी विवाह केला. १९६०च्या ऑक्टोबरमध्ये तिच्यापासून त्याला झालेला मुलगा हा राजपुत्र रेझा. तो अमेरिकेत लष्करी शिक्षण घेतो. त्याचा राज्याभिषेक करून पहलवी घराण्याचे राज्य सुपूर्द करायचे अशी मध्ययुगीन महत्त्वाकांक्षा शहा परवापर्यंत बाळगून होता.

१९६३ मध्ये इराणच्या सुप्रसिद्ध श्वेतक्रांतीची घोषणा झाली. मजलिस ही इराणची संसद. मजलिसच्या निवडणुकांवर तोपर्यंत धनाढ्यांचेच पूर्ण नियंत्रण असे. श्वेतक्रांतीच्या आगमनाबरोबर मोठ्या प्रमाणात बड्या उद्योगपतींच्या आणि जमीनदारांच्या या वर्चस्वाला धक्का लागला. आजही आपल्याकडे निवडणुका जशा सरंजामशहा आणि जमीनदार किंवा आधुनिक प्रकारचे सरंजामशहा उदा. महाराष्ट्रातले साखर-कारखाने, यांच्या दडपणाखाली लढवल्या जातात तशीच परिस्थिती इराणमध्ये होती. अर्थात इराणमध्ये धर्मसंघटनाही युरोपातल्या चर्चप्रमाणेच प्रारंभी प्रबल होती. ती शहाने अगदी सुरुवातीपासूनच निश्चितपणे आणि दूरगामीरित्या पण अप्रत्यक्ष साधने वापरून दुर्बल केली. पैसेवाल्यांच्या बाहुल्या उमेदवार म्हणून उभ्या राहणार आणि मजलिसमध्ये जनप्रतिनिधी म्हणून वावरणार आणि ज्यांच्या जोरावर आपण निवडून आलो त्यांचे हितसंबंध सुरक्षित राखणार हे १९६३ पासून बदलले. मात्र आधीच्या हितसंबंधियांची जागा आता कारखानदार किंवा नोकरशहांनी घेतल्याने, त्यांचेच पित्ते मजलिसमध्ये वावरत आहेत.

निवडणुकांवरचे पैशाचे वर्चस्व कमी होणे ही तात्कालिक घटना हा श्वेतक्रांतीचा दृश्य व प्रमुख परिणाम होता.

दुसरा रूढीबद्ध धर्मांधांना खवळायला लावणारा निर्णय म्हणजे स्त्रिया बुरख्याच्या बाहेर आल्या आणि त्यांना मतदानाला किंवा निवडणूक लढवायलाही कायद्याने मुभा मिळाली. यामुळे समाजाचे चित्र झपाट्याने पालटले. १९६३ च्या सप्टेंबरमध्ये ज्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यात नवनिर्वाचित मजलिसमध्ये मोठ्या प्रमाणावर स्त्रिया निवडून आलेल्या होत्या.

१ जानेवारी १९६२ पासूनच भू-पुनर्रचनेची घोषणा करण्यात आली होती. श्वेतक्रांतीच्या वेगात हेही प्रचंड काम स्तुत्य वेगाने पार पडू लागले. इराण प्रामुख्याने कृषिप्रधान देश होता. औद्योगिक क्षेत्रातील कामगार हे फारच कमी प्रमाणात आढळतात. या तीन प्रमुख क्रांतिकारक घटनांना कुरणांचे आणि जंगलांचे राष्ट्रीयीकरण वगैरे दुय्यम महत्त्वाच्या उपक्रमांची जोड होती.

**औद्योगिक वाटचाल व संरक्षण :** औद्योगिक क्षेत्रातील पीछेहाट

भरून काढण्यासाठी गेल्या दहा वर्षांत फारच मोठ्या प्रमाणात पैसा ओतण्यात आला. कल्पनातीत पैसा खर्चून अवजड उद्योगधंदे प्रामुख्याने अमेरिकेच्या आणि ब्रिटनच्या सहकार्याने उभारण्यात आले. तेलाच्या व्यापारामुळे पैसा प्रचंड मिळत होता आणि तो या उद्योगधंद्यांना पुरून उरत होता. तो सरळ शहाच्या खाजगी खजिन्यात, त्याच्या मंत्रिमंडळात, नोकरशाहीत पाझरत होता. मुघलकालीन सुरतची विसाव्या शतकातले तेहरान आठवण करून देते. याबरोबरच उत्तरेकडचा रशिया आणि पश्चिम सरहद्दीवरचा इराक यांच्याशी शहाचे संबंध हळूहळू बिघडू लागले. इराणची अर्थ-व्यवस्था भांडवलशाही राष्ट्रांच्या ताब्यात जाते आहे, हे पाहिल्यावर रशिया चिडणे स्वाभाविकच होते. परत इराणच्या प्रचंड आर्थिक ताकदीने व अफगाणिस्तान, पाकिस्तान यांसारख्या दुबळ्या राष्ट्रांच्या हद्दीवर असणाऱ्या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे त्याचे महत्त्व दुर्लक्षून चालणासारखे नव्हते. यातूनच संरक्षणव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवला. नुसते या खर्चाचे आकडे पाहिले तरीसुद्धा इराणच्या संपत्तीची कल्पना येईल. इराणने आपले विमानदल मध्यंतरी प्रचंड प्रमाणावर आधुनिक करून घेतले. स्वयंचलित व अत्याधुनिक दूर पल्ल्याच्या शस्त्रांसाठी अमेरिकेशी अगदी ताजा जो करार इराणने केला आहे, त्याची किंमत सुमारे १५०० कोटी डॉलर्स एवढी आहे ! यातून मोठ्या प्रमाणात आधीच संपूर्ण सैन्य नटवण्यात आले आहेच.

**परराष्ट्रीय धोरण :** अमेरिका, पश्चिम युरोप, जपान आणि १९७३ पासून इस्राएल हे इराणच्या तेलाचे प्रमुख ग्राहक. तेलाचा पुरवठा सतत चालू रहावा यासाठी या ना त्या परीने इराणचा खजिना भरला जातच होता. इराणच्या या पश्चिमेशी चाललेल्या शय्यासोबतीमुळे मध्यपूर्वेतले शेजारी साहजिकच दुखावले गेले. गल्फ देशात होणारे क्रान्तीचे प्रयत्न दडपणे ( त्या प्रयत्नांना बहुतेक वेळी इराकचा पाठिंबा असत आलेला आहे. ) इथिओपिआ–सोमाली युद्धात रशियाच्या विरोधी म्हणजेच अमेरिकेच्या बाजूची भूमिका घेणे व अमेरिकेला तिथे मदत करणे, इस्राएलशी व्यापारी संबंध चालू ठेवणे किंवा अगदी अलीकडे सादातच्या शांततेच्या प्रयत्नांना पाठिंबा देणे अशा उद्योगांमुळे इराणचे पाय जमिनीवरून सुटल्यासारखे झाले.

**धर्म :** आज इराणमध्ये जे दंगे चालू आहेत, त्यांचे प्रमुख दोन भाग. पहिला इस्लामचे पुनरुज्जीवन करण्याचा हट्ट धरणाऱ्यांचा. दुसरा डाव्या चळवळीचा. या इस्लामचे पुनरुज्जीवन करणाऱ्यांनी काळाची गती उलटीच फिरवायचे ठरवल्यासारखे आहे. आयेतुल्ला खोमेनी हा त्यांचा नेता. तो सध्या पॅरिसमध्ये आहे. प्रचंड प्रमाणावर धर्मवेडचांचा जो उद्रेक झाला त्याचा सूत्रधार हा हद्दपार केलेला धर्मगुरु. त्याला लिबिया आणि इराकचा पाठिंबा आहे, असे शहाचे म्हणणे. शरियत मदारी हा इराणमधला धर्मगुरु तिथ राहून संप पुकारणे, बंद पाळण्याचा आदेश देणे वगैरे उद्योग करतो. जुलैमध्ये आयेतुल्ला शेख अहमद खफी या मुल्लाच्या संशयास्पद मृत्यूवरून जो या आंदोलनांना जोर चढलेला आहे तो उतरलेलाच नाही. मध्यंतरी दुष्काळात तेरावा महिना तसा सणसणीत भूकंपाचा एक तडाखा इराणला बसला, त्यामुळे जरा तरी हा गोंधळ कमी होईल असे वाटले होते; पण अल्पावधीतच सरकार आणि विरोधक सावरले नि एक-मेकांच्या उरावर बसायला सज्ज झाले. हा आयेतुल्ला शेख अहमद शफी मोटार-अॅक्सिडेंटमध्ये ठार झाला. तो अॅक्सिडेंट घडवून आणून त्याला ठार केला असे विरोधकांचे म्हणणे. सरकारपक्ष अर्थातच त्याचा इन्कार करतो. त्याची अंत्ययात्रा जी निघाली ती शेवटी शहाविरोधी निदर्शनातच परिवर्तित झाली. Savak ही शहाची खास अंतर्गत सुरक्षाव्यवस्था. आणीबाणीमध्ये जसा आपल्याकडे Raw चा माज वाढला होता तशी या Savak ची इराणमध्ये फार दहशत आहे. गुप्त चौकशा, कबुलीजबाब जुलुम-जबरदस्तीने मिळविणे, राजकीय विरोधक अचानक अदृश्य करणे वगैरे कामे या Savak ने निष्ठेने पार पाडली. या निदर्शनांच्या वेळी ४० जणांना गोळ्या घालून ठार मारले गेले. मग वातावरण पूर्ण बिघडले. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर हे हिंसाचाराच्या थैमानाचे तीन महिने झाले. ऑक्टोबरच्या उत्तरार्धापासून परत जो नव्या दमाने हिंसाचार सुरू झाला तो आजतागायत.

शहाने पद्धतशीर जी धर्माची मक्तेदारी संपुष्टात आणली तिची ही सरळ प्रतिक्रिया. आधुनिकीकरणालाच यांचा मूलतः विरोध. शरियतनुसार कायदे, मुल्ला-मौलवींचे राजकारणावर पुनः वर्चस्व या यांच्या मागण्या. त्या विसाव्या शतकाशी कितपत साजेशा आहेत याचा इथे विचारच नाही. त्या मागण्यांना शहाचा विरोध म्हणून यांचा शहाला विरोध.

**आजचा इराण :** धार्मिक विरोधक हे एका दिशेला राज्य नेऊ इच्छितात. ( वस्तुतः त्या दिशेने केवळ अंधार आहे. ) राजकीय विरोधक अधिक वस्तुनिष्ठ अभ्यास करतात. अमेरिकेने आणि ब्रिटनने आपला देश आतून पोखरला आहे याची त्यांना जाणीव आहे. आजच्या इराणची परिस्थिती काय आहे याची झलक दाखवायला एक उदाहरण पुरेसे बोलके आहे. तेहरानच्या एका मोठ्या कंपनीमध्ये एका भारतीय इंजिनिअरशी प्रसिद्ध लेखक शिव नायपाल याने वातचीत केली. तो इंजिनिअर मजेने प्रवास करावा म्हणून इराणमध्ये आला होता. तिथे काही तरी साधी, तांत्रिक अडचण आली ती त्याने दूर केली. तेव्हापासून प्रचंड पैसा ओतून त्यांनी त्याला तिथेच ठेवून घेतला. त्याच्या सांगण्याप्रमाणे एक बल्ब गेला तर दुसरा त्या जागी लावणे, हेसुद्धा त्या लोकांना माहिती नाही, मग इतर मोठे तांत्रिक प्रश्न सोडवणे दूरच. आज अज्ञानाने अशी पातळी गाठली आहे की, जड उद्योगधंद्याची पाश्चात्य सामुग्री कोणीही इराणी माणूस चालवीत नाही. बहुतेक भारतीय किंवा पाकिस्तानी तंत्रज्ञ तिथे आहेत. तीच गोष्ट वैद्यकीय व्यवसायाची. मेडिकल कॉलेजात शिका-यचेच कशाला, हीच भूमिका फोफावत आहे. पैसा टाकून जर प्रत्येक गोष्ट मिळते आहे तर जरा बिघाड झालेल्या वस्तू बाहेरचा माणूस आणून तरी दुरुस्त करायच्या किंवा सरळ नवीनच घ्यायच्या, ही प्रवृत्ती निर्माण झाली आहे.

सरकारी नोकरांनी प्रासादतुल्य घरे बांधली आहेत. त्यांच्या लंडन–पॅरिस–न्यूयॉर्क अशा सहज वाऱ्या चाललेल्या असतात. कार-खान्यातल्या सगळ्यात खालच्या कामगाराला दिवसाला सुमारे १०० रु. मिळतात तर इंजिनिअरला दिवसाला ५०० रु. मिळतात. यावरून पैशाची कल्पना येईल. यांची मुलं केवळ पैसा उडवण्यासाठी जन्माला आलेली आहेत. गिटार वाजवीत पाश्चात्य संगीतावर नाचणे, दारू पिणे, पॅरिस, लंडनला जाऊन रंगेल रात्री उपभोगणे

ही त्यांची जीवनाची व्याख्या आहे. फेडेड जीन्स घालून हे शाहजादे फक्त पैसा उधळत आहेत. दीड लाख वॉशिंग मशिन्स वर्षाला तयार करणारा कारखाना (प्रत्येक सुटा भाग इटलीहून आयात) लोकांची मागणी अंशतःही पुरी करू शकत नाही. आठवड्याला शंभर हिलमन कार्स बनवणाऱ्या मोटरकंपनीची वेटिंग लिस्ट वाढतेच आहे; पण हा सगळा डोलारा आहे. कागद एकत्र टाचण्याच्या स्टेपलरच्या स्टेपल्स-सुद्धा एकही इराणी उद्योग इराणी बुद्धीने करू शकत नाही. एका रात्रीत जर सगळे विदेशी देश सोडून गेले तर तो देश-काही तासांत बंद पडेल, ही भयाण वस्तुस्थिती आहे आणि हा विचार करणारे फारच थोडे आहेत.

ज्या तेलाच्या जोरावर त्यांच्या एवढ्या उड्या चाललेल्या आहेत ते पंचवीस वर्षांत उतरणीला लागेल. तेव्हा जवान असणारी पिढी परंपरागत उदरनिर्वाहाची शेतीही करू शकणार नाही, गालिचेही विणू शकणार नाही. प्रचंड पैशाने मूढ झालेला तो देश आहे आणि त्याविरुद्धच बगावत सुरू झाली आहे.

इराण खऱ्या अर्थाने मुस्लिम म्हणता येणार नाही. इस्लामने त्यावर चढाई केली; पण त्याआधीही हजार वर्षे अस्तित्वात असणाऱ्या संस्कृतीने इस्लाम पचवला. झरथुष्ट्राचे सूर्योपासक वंशज इराणी आर्यांशी नाते सांगतात. आजही विचार करणारे जे इराणी आहेत त्यांना हीच एक आशा आहे की, पश्चिमही आम्ही पचवू. पण आज-वर जे घडले आहे ते पहाता हा मार्ग फार किंमत मोजून चोखाळावा लागणार, असे दिसते. 'धोबी का कुत्ता, न घर का न घाट का', अशी इराणची परिस्थिती आहे.

आणि याच परिस्थितीविरुद्ध, प्रत्येक ठिकाणी जे होते तसेच, अगदी बूर्झ्वा आणि अगदी डाव्या अशा शक्तींनी शिंग फुंकले आहे. आपल्याकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मुस्लिम लीग आणि नक्षलवादी हे प्रस्थापित इंदिराशाहीविरुद्ध जसे उठले तसेच थोड्या-फार फरकाने इराणमध्ये घडत आहे. पैसा खालच्याच लोकांनी इतका जमवला आहे तर शहाने किती जमवला असेल? भू-मध्यसमुद्रामध्ये त्याने कित्येक कोटी डॉलर्सचे एक बेट खरेदी करून त्यावर एक प्रचंड राजवाडा बांधल्याची वदंता आहे. जर कधी प्राणावरच बेतले तर बायका-मुलांसह पलायन करून तो ते बेट गाठणार, हे उघड आहे.

बुद्धिभ्रष्ट माणसासारख्या त्याच्या आता निराश हालचाली चालू आहेत; पण प्रश्न फक्त त्याच्या भवितव्याचा नाही. प्रश्न इराणच्या अस्तित्वाचाच आहे. लष्कर आजवर शहाच्या बाजूने आहे म्हणून त्याचे मयूरसिंहासन शाबूत राहिले; पण पेटलेल्या वणव्यात त्याची आहुती पडणार की काय, असे वाटावे इतकी परिस्थिती आटोक्या-बाहेर गेलेली आहे. कुणाचेच नियंत्रण नाही अशी एक भीषण यादवी इराणमध्ये माजलेली आहे.

□


तार : NATLEATHER

दूरध्वनि : ६९५२३६-३७-३८

दर्जेदार 'गरुड छाप' मालाचे उत्पादक

**दि नॅशनल लेदर क्लॉथ मॅन्युफॅक्चरिंग कंपनी**

अकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० ०६८.

सर्वोत्कृष्ट सिंथेटिक फोम लेदर क्लॉथ (रेक्झिन) चे निर्माते

**खास उत्पादन "रॉयल टच" फोम**

लेदर क्लॉथ – स्त्रियांच्या हॅण्डबॅग्ज, सोफा – कार्स इत्यादींचे कुशन

चपला – बूट, तयार कपडे वगैरेसाठी आदर्श !

# संघ : केरळात खरोखर काय घडत आहे ?

## दोन उलटसुलट चित्रे

### स्वयंसेवकांवर खुनी हल्ले

(साप्ताहिक विवेक, मुंबई, १२ नोव्हेंबर अंक)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यक्रम शाळांच्या वास्तूतून करण्यात केरळ सरकारने मनाई केली आहे. माजी मुख्यमंत्री श्री. अँटोनी यांनी हा निर्णय जाहीर केला होता. त्यांनी राजीनामा दिल्यानंतर मुख्यमंत्री बनलेल्या कम्युनिस्ट वासुदेवन नायर यांनी हा निर्णय कठोरपणे अमलात आणला जाईल, असे वेळ न दवडता घोषित केले. केरळातील संयुक्त आघाडीच्या सरकारशी मार्क्सवादी कम्युनिस्टांचे कितीही हाडवैर असले तरी संघाबाबत मात्र त्यांचे एकमत आहे. संघाविरुद्ध हे जे काहूर केरळमध्ये चहूबाजूंनी उठविण्यात येत आहे, ते त्या भागातील संघाच्या वाढत्या प्रभावाचेच द्योतक आहे.

केरळमध्ये संघाचा प्रभाव वाढत आहे आणि म्हणूनच संघ-स्वयंसेवकांवरील खुनी हल्लेही वाढत आहेत. संघ-शाखांवर देण्यात येणाऱ्या लाठीच्या शिक्षणाचा बाऊ करीत असतानाच मार्क्सवाद्यांच्या गुंडांना खुनी हल्ला करण्याचे प्रशिक्षण पद्धतशीरपणे देण्यात येते, या बाबीकडे मात्र सोयिस्करपणे डोळेझाक करण्यात येते. या खुनी गुंडांकडून संघ-स्वयंसेवकांवर होणाऱ्या हल्ल्याचे प्रमाण गेल्या काही दिवसांत एवढे वाढले आहे की, संघ-स्वयंसेवकांना एकटयादुकटयाने सुरक्षितपणे फिरणेही मुष्किल झाले आहे. अर्थात संघाचे स्वयंसेवक लेचेपेचे नव्हेत. स्वतःचा जीव धोक्यात घालूनही संघाच्या शाखा केरळात चालविण्याचा त्यांचा निर्धार कायम आहे.

मार्क्सवादी गुंडांचा हा धुमाकूळ केरळात सर्वत्र असला तरी कन्ननोर या मागासलेल्या जिल्ह्यात या गुंडगिरीचे प्रमाण अधिक आहे. गेल्या काही आठवडयांचा विचार केला तर दर दोन दिवसांमागे एका तरी स्वयंसेवकाचा मार्क्सवाद्यांच्या खुनी हल्ल्यात बळी पडला असल्याचे दिसून येईल. संघ-स्वयंसेवकांवर किंवा संघप्रेमी नागरिकांवर मार्क्सवाद्यांनी हल्ला केला नाही, असा दिवस जात नाही. तेलिचेरीजवळ, एका गावी संघशाखेवरच मार्क्सवाद्यांनी हल्ला चढवला आणि पी. चंद्रन हा त्या शाखेवरील शिक्षक हल्लेखोरांना प्रतिकार करीत असतानाच मृत्युमुखी पडला. गेल्या २९ ऑक्टोबरलाच त्या ठिकाणी पवित्रन नावाच्या एका स्वयंसेवकावर रस्त्यात मागून हल्ला करण्यात आला, तर तेलीचेरी तालुक्यातच चोकली या गावी पवित्रन या संघस्वयंसेवकावर हल्ला करून त्याला जबर जखमी करण्यात आले.

परल ( तालुका तेलीचेरी ) येथील संघशाखेवर हल्ला झाला. संघ-स्वयंसेवकांनी निकराचा प्रतिकार केला. या चकमकीत एक मार्क्सवादी कार्यकर्ता मृत्यू पावला हे खरे; पण संघाच्या शाखेवरील तीस स्वयंसेवक जखमी झाले. याही आधी चारच दिवस त्या ठिकाणी दोन गटात अशीच चकमक झाली होती. मार्क्सवाद्यांना 'चोराच्या उलटया' मारायला कारण पुरेसे होते. त्यांनी लगेच संघाविरुद्ध काहूर माजवायला प्रारंभ केला आणि निमित्तालाच टेकलेल्या केरळ सरकारनेही संघावर बंधने घालण्याचा निर्णय तातडीने घोषित केला.

खरी गंमत अशी की, मार्क्सवाद्यांचे कार्यकर्ते आणि नेते मंडळी ही इतकी असहिष्णू आहेत की, त्यांना अन्य कोणीही बलिष्ठ झालेले खपत नाही. या पोटदुखीतूनच 'संघाला नामशेष करू!' ही वल्गना जन्मास आली आहे. मार्क्सवाद्यांनी हल्ला करण्याचे सत्र सुरू केल्याने, विशेषतः कन्ननोर या त्यांच्याच बालेकिल्ल्यात वातावरणात तणाव आणि दहशत निर्माण झाली. कन्ननोरमध्ये संघाची शाखा चालविण्याची या पोरांची हिंमत आहे म्हणजे काय ? या विचाराने मार्क्सवाद्यांचा मस्तकशूळ उठला आणि जिल्हाधिकाऱ्यांनी बोलावलेल्या 'शांतता समिती'च्या बैठकीतच मार्क्सवाद्यांनी सरळ सरळ जाहीर करून करून टाकले : 'आम्ही कोणाशीही जमवून घेऊ; पण आर. एस. एस. शी कदापि जमवून घेणार नाही!'

मार्क्सवाद्यांचे सर्वश्रेष्ठ नेते ई. एम. शंकरन नंबूद्रीपाद यांनी तर मोठ्या आढ्यतेने सांगितले की, "संघाशी खरा लढा आम्हीच देत आहोत. इतरजण नुसत्या वल्गनाच करीत आहेत!" येथवरच्या विवेचनावरून हे लक्षात आले असेलच की, संघाशी मार्क्सवादी लढत आहेत म्हणजे संघ-स्वयंसेवकांचे मुडदे पाडण्याची तयारी ते करीत आहेत. ही मुडदेफराशी अजून अन्य संघविरोधकांनी सुरू केली नाही, ही कॉम्रेड नंबुद्रीपादांची व्यथा आहे, आणि इतके असूनही हिंसाचाराला प्रोत्साहन कोण देतो तर संघच म्हणे !

आणीबाणी उठल्यानंतर संघ-स्वयंसेवकांनी नव्या जोमाने संघाच्या शाखा केरळात सुरू केल्या. नव्या उमेदीच्या तरुणांनी या शाखा बहरू लागल्या. आणि विशेष म्हणजे समाजातील अगदी तळातला वर्ग संघाच्या अगदी जवळ आला. संघ केवळ वाढू लागला एवढेच नव्हे तर 'नाही रे' वर्गाचे प्रमाण स्वयंसेवकांत वाढू लागले. ही वाढ अशीच अप्रतिहत चालू राहिली तर केरळातील आपले स्थान धोक्यात येईल, एवढा दूरवरचा विचार करून संघ-स्वयंसेवकांचे खून पाडण्यास मार्क्सवादी गुंड उद्युक्त झाले आहेत.

कन्ननोर जिल्ह्यातील पन्नियन्नूर येथील घटना मोठी उद्बोधक आहे. जोस आणि व्हिन्सेंट ही दोन ख्रिश्चन मुले संघशाखेवर येऊ लागली. संघात चांगलीच रमली ती. आणि ही गोष्ट गावातील तथाकथित दाद-

मंडळींना खटकली. संघामध्ये ख्रिश्चन मुले जातात, तेथे रमतात, संघात त्यांना बंदी केली जात नाही ही गोष्ट एकदा बाहेर पसरली की, मग संघावर जातीयवादाचा शिक्का कसा मारता येणार? संघ जातीय द्वेष पसरवतो, असा विषारी प्रचार तरी आपण कसा करू शकणार? या विचाराने त्या दोघा ख्रिश्चन मुलांना प्रथम शाखेवर न जाण्याबद्दल सुचवून पाहण्यात आले. धाकदपटशा दाखवून झाला; पण जोस आणि व्हिन्सेंट यांची शाखा काही बंद होईना. मग त्यांच्या सबंध कुटुंबावरच मार्क्सवाद्यांनी हल्ला चढविला. त्या दोघा अश्राप मुलांना तर जबर मारहाण करण्यात आली.

एका मार्क्सवादी कार्यकर्त्याचा मुलगाच संघात येत होता. त्याच्यावर हल्ला करण्यात आला. आपल्या जखमी मुलास पाहण्यासाठी हा मार्क्सवादी कार्यकर्ता दवाखान्यात गेला. या 'घोर' अपराधासाठी त्याच्या सबंध कुटुंबावर हल्ला चढविण्यात आला. आणीबाणी संपल्यावर एकट्या कन्ननोर जिल्ह्यात सुमारे तीस संघ-स्वयंसेवक मारले गेले आहेत.

मार्क्सवाद्यांपेक्षा 'हम भी कुछ कम नही' हे दाखविण्याची खुमखुमी काँग्रेसवाल्यांनाही आली आहे. कन्ननोरची आघाडी मार्क्सवाद्यांनी सांभाळली आहे, तर बाहेर काँग्रेस कार्यकर्ते सुरे पाजळून सरसावले आहेत. गुरुवायूरजवळ असलेल्या पुन्नयूरकुळम येथे संघाच्या शाखेत हरिजनांची संख्या वाढते आहे, हे पाहिल्यावर स्थानिक काँग्रेसवाल्यांचे पित्त खवळले आणि त्यांनी २५ ऑक्टोबर रोजी चक्कन या ५४ वर्षे वयाच्या हरिजन स्वयंसेवकाचा खून केला. चक्कनच्या तिन्ही मुलांना कुठेही काम मिळणार नाही अशी व्यवस्था केली.

चक्कनचे तिघे मुलगे सध्या जखमी अवस्थेत हॉस्पिटलमध्ये आहेत. बापाचा खून पडला आणि आपण जखमी झालो, तरी शाखा सोडायची नाही, हा त्यांचा निर्धार आहे!

मार्क्सवादी कम्युनिस्ट आणि केरळातील संयुक्त आघाडीचे सरकार यांनी जणू हातात हात घालून संघाविरुद्ध लढाई पुकारली आहे आणि केरळच्या स्वयंसेवकांनी ते आव्हान स्वीकारले आहे! □

## सशस्त्र कवायतीवर बंदी!

**(साप्ताहिक युगांतर, मुंबई, २६ नोव्हेंबर अंक)**

शस्त्रांचा साठा करणे, शस्त्रांचा वापर करण्याचे शिक्षण देणे, सशस्त्र कवायती करणे आणि रस्तोरस्ती कवायतीपद्धतीने पथकांच्या मिरवणुका नेणे याबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर (आर्. एस्. एस. वर) बंदी घालण्यात येणार असल्याचे केरळच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

नोव्हेंबरच्या ४ तारखेस घेतलेल्या एका पत्रकारपरिषदेत केरळ राज्याचे मुख्यमंत्री पी. के. वासुदेवन् नायर यांनी ही घोषणा केली.

प्रतिस्पर्धी पक्षांच्या कार्यकर्त्यांवर, त्यांच्या अनुयायांवर सशस्त्र हल्ले करणे; त्यांचे खून करणे; इतकेच नव्हे, तर गरीब जनतेवर हल्ले करणे, तिला सतावून सोडणे इत्यादी प्रकार आर्. एस्. एस्. संघटनेने गेले दोन महिने, केरळ राज्याच्या वेगवेगळ्या भागांतून सतत चालू केले आहेत. आर्. एस्. एस्. ने माजविलेल्या या अंदाधुंदीमुळे आणि बेबंदशाहीमुळे राज्यातील जनतेच्या वित्ताला आणि जीविताला धोका निर्माण झाला आहे. त्यावर तातडीची उपाययोजना म्हणून राज्यसरकारला ही बंदी आणणे क्रमप्राप्त झाले आहे.

### भाले–तलवारींचा वापर!

भाले-तलवारी घेऊन जिल्ह्याच्या अनेक भागांत आर्. एस्. एस्. ने लोकांवर हल्ले केल्याची अनेक उदाहरणे असल्याच्या घटनांचे पुरावे चिमूर जिल्ह्यात मिळाले. त्याबाबत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा सचिव मंडळाने ४ नोव्हेंबर रोजी एक निवेदन जाहीर केले.

तेलिचेरी तालुक्यात, पनूर गावाजवळ ई. राजू या शिक्षकाचा आर्. एस्. एस्. च्या गुंडांनी २६ ऑक्टोबर रोजी खून केला. ई. राजू हे मार्क्सवादी पक्षाचे सभासद होते.

त्रिचूरजवळच्या वल्लाचिरा पंचायतीच्या भागात अँटनी या एका गरीब कामगाराचा आर. एस्. एस्. च्या गुंडांनी निर्घृणपणे खून केला

मडिक्काई येथील गरीब लोकांच्या घरावर आर. एस्. एस्. च्या लोकांनी हल्ले केले. तेथील शेतकऱ्यांचे धनधान्य आणि त्यांची जी काय मालमत्ता असेल तिची नासधूस केली. मडिक्काई हे गाव कॅन्नानोर जिल्ह्यातील होसदुर्ग तालुक्यात आहे.

आपल्या राजकीय विरोधकांचे खून करण्यास आर. एस्. एस्. संघटना कमी करीत नाही. असली हिंसाचारी कृत्ये करण्याचे त्या संघटनेच्या अनुयायांना उघड उघड शिक्षण देण्यात येते. जनता पक्षावर आर एस्. एस्. ची पकड जोरदार झाल्यानंतर आर. एस्. एस् च्या या कृत्यांना अधिकच चेव आला आहे, अशा आशयाचे निवेदन पक्षाच्या केरळ राज्याच्या चिटणिसांनी काढले आहे. अशाही परिस्थितीत जनता पक्षाच्या धोरणांना पाठिंबा देण्याचे आणि त्या पक्षाला पाठिंबा मिळवून देण्याचे प्रयत्न करण्याचे कार्य मार्क्सवादी पक्षाने चालू ठेवल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला आहे.

मार्क्सवादी पक्षाच्या केरळ राज्याच्या सचिव मंडळानेही याबाबत पुढील निवेदन काढले आहे :

“गेल्या काही महिन्यांत आर. एस्. एस्. संघटनेने हिंसाचारी कृत्ये केली, खून केले. त्यामुळे या राज्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या हिंसाचाराला आमच्या पक्षाचे कार्यकर्ते बळी पडले. हिंदूंचे वर्चस्व स्थापन करण्याची मोहीम या संघटनेने चालविलेली आहे. आर. एस्. एस्. ने चालविलेल्या हिंसाचाराला जनता पक्ष सत्तेवर आल्यापासून ऊत आला आहे. आर. एस्. एस्. च्या अत्याचारांचा मुकाबला करण्यासाठी लोकांनी एकत्र यावे!” असे आवाहन मार्क्सवादी पक्षाने वर दिलेल्या निवेदनात केले आहे.

मार्क्सवादी पक्षाच्या या निवेदनावरून केरळ राज्याचे जनता पक्षाचे सेक्रेटरी एम्. पी. वीरेन्द्रकुमार आणि मार्क्सवादी पक्षाच्या केरळ राज्य–शाखेचे सेक्रेटरी. ई. के. नवनार यांच्यात खडाजंगी झाली. अखेर वीरेंद्रकुमार यांनी यापुढे अशा घटना होऊ न देण्याची ताकीद त्यांच्या जिल्हा–समित्यांना दिली आणि असल्या अत्याचारी कृत्यांची अप्रत्यक्षपणे कबुलीच दिली.

**बुरखा फाटत चालला !**

आर. एस्. एस्. ही संघटना ही एक केवळ सांस्कृतिक संघटना असल्याची फसवी घोषणा जनतेच्या डोळ्यांसमोर सतत ठेवून या संघटनेच्या नेत्यांनी जनतेच्या डोळ्यांत आज अनेक वर्षे धूळफेक केली.

केरळ राज्यातील घटना हे या संघटनेच्या सांस्कृतिक कार्याचे ताजे पुरावे आहेत. उत्तर भारतात या संघटनेने जातीय दंगली घडवून आणल्या. पुरोगामी प्राध्यापकांवर हल्ले केले. पुरोगामी विचारांच्या लिखाणावर, सभांवर या संघटनेच्या कार्यकर्त्यांचे, त्या संघटनेशी सख्य असलेल्या विद्वानांचे सततचे हल्ले चालू असतात.

समाजाला प्रगतीच्या मार्गावर रोखून धरणे, त्याला गतकाळात नेणे, हे या संघटनेचे कार्य आहे.

असे असूनही जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर या संघटनेपासून देशाला धोका नसल्याचा निर्वाळा उज्जैनच्या परिषदेत देतात; हाच एक मोठा धोका देशाला आहे. □

कथा

# मोगरा

## व्ही. वाय्. पाटील

उन्नत गळकं आभाळ मेघांनी भरून आलं. संध्या काळवंडली होती. दूरवर ऐकू येणारा सागरी लाटांचा आवाज वातावरणात भरून राहिला होता. माड वाऱ्याने सुन्न झाले होते. झावळ्यांवर पडणाऱ्या थेंबांचे आवाज आबाच्या मनात फेर धरून नाचत होते.

झाडाच्या बुंध्यासारखा आबा जड झाला होता. पाठ भिंतीला टेकल्यामुळं थंडगार झाली होती. आबाच्या गालांवर अश्रू ओघळत होते. तुटलेल्या काचेसारख्या आठवणी जुळविण्यात किती वेळ गेला आबाला समजलंच नाही. काळोखाची चाहूल त्याला अद्याप लागली नव्हती. समोरच्या खाडीत वाऱ्याचा गोंगाट चालूच होता. रात्रभर गोंगाट चालणार होता. माडावरून चुडीत कोसळल्याचा आवाज झाला. आबा भानावर आला. थरथरत्या हातांनी अश्रूंची वाट त्यानं मोकळी केली.

'भाटी' काजू व आंब्याच्या झाडांनी वेढली होती. डोंगरउतरणीला काजू-आंब्याच्या बागा. त्याला लागून नारळांची भाटं. खाडीलगत मिठागराची लांबलचक पट्टी. माडांच्या बनात भुईछत्रासारखी उगवलेली भाटी. जुनाट चिरेबंदी घरं, झावळ्यांनी शाकारलेली घरं. घरं कसली, खोपटचाच त्या! जुनाट घरांना पंख पसरल्यासारख्या दोन्ही बाजूंस पडव्या. शेतातून पायवाटेनं गेल्यास वेतोबाचं देऊळ. या तिठ्यावर भैरवनाथ तर त्या तिठ्यावर खळनाथ डोंगरावर गोपीनाथ तर तळ्याकाठी नागनाथ भाटीची लाडकी सून ती आबाची बायको. सगळी भाटी तिला सुमती म्हणायची.

लग्नाच्या चार वर्षांनंतर मोगराला जन्म देऊन सुमती निघून गेली. बाईलवेडा आबा दुःखी झाला. साऱ्या भाटीनं आणि खोपटांनी मोगराचे लाड केले. आबाला दुसरं लग्न करण्याचा जाणत्यांनी सल्ला दिला. आबाला आपल्या हातानं मोगराला दूर लोटायचं नव्हतं. मोगराचं न्हाणं, धुणं आबानं आपल्या हातानी केलं. मोगराचं बालपण सजवलं-नटवलं. दारातील तुळसीवृंदावनासारखी तिची काळजी घेतली. दारात वेल व घरात मोगरा डवरली. तिच्या ओठांच्या पाकळ्या सुकल्या तर आबाचा जीव सुकायचा. पोरीसाठी सारे कष्ट केले. शेत असो वा गवंडीकाम, रापण असो किंवा रंगकाम, सगळ्या धंद्यात आबा हुषार ! पठ्ठ्या शरीराने धष्टपुष्ट. भाटीच्या परिसरात त्याचा चांगला नावलौकिक. झक्कास तीन खणांचं घर उभारलंन. अडल्या-नडल्यास आबाचा हात पुढं.

बघता बघता मोगरा पंधरा-सोळा वर्षांची झाली. साऱ्या खोपटांतली माणसं मोगऱ्या, मोगऱ्या करायची. मोठे टपोरे डोळे, गोबरे गाल, खळखळणारं हास्य आणि केतकी रंग ! गोड बोलणं व लाजबाब चालणं. मोगरा पाण्याला चालली की वारा तिच्याशी गिरक्या घेत चालायचा. आबाचं जीवन मोगरानं फुलवलं. मोगराचं वय वाढलं. आबाकडं पैशाची माया वाढली.

भिवाचं घर पलतडी आगरात होतं. पन्नाशी उलटलेला भिवा. माडाच्या खोडासारखा भिवा. लाटांवर खेळणारा तांडेल. पहाटे केव्हाच रापणीसाठी निघून गेलेला असायचा. दुपार सुस्त घोरण्यात. भिवाच्या जाणत्या पोराचं नाव सावळ्या. पोर बापासारखंच निघालं. सावळ्याचा सारा दिवस खाडीत हेलकावणाऱ्या लाटांबरोबर निघून जायाचा. शाळेत त्याला गोडी नव्हती. लिहिता-वाचता येत होतं इतकंच.

भिवानं आज सकाळीच तारीवर होडी नांगरली आणि तो आबाच्या घराकडं निघाला. तारीवरून आबाचं घर दिसायचं. 'आबा ऽऽ!' भिवानं हाक दिली. 'ये भिवा, आत तरी ये !' आबा उद्गारला. भिवानं बूड टेकलं. म्हणाला 'आबा, थोडं काम होतं!'

'... सांगायला काय भिती वाटते?' आबाचा प्रश्न.

तसं नाही. पण ... स्पष्टच सांगायचं तर मोगरा सून म्हणून... मला पसंत होती. 'तुझा विचार काय ?' भिवानं मन मोकळं केलं.

'छान !' आबानं होकार दिला. मामला खुशीचा होता. झालं, लग्न ठरलं. भाटीत व पलतडीत आनंदाला उधाण आलं. मोगरा सावळ्याच्या तब्बेतीवर खुष होती.

आबानं भिवाला पैसा खर्च करू दिला नाही. सारा खर्च आबानं मुक्तपणे केला. घावणेकराकडे कपड्यांची खरेदी केली. सुर्लकराकडे तांदुळाची खरेदी झाली. आनंद शेट्टीयानं दागिने बनविले. हजार जिनसांची खरेदी झाली. सारं लेकीला विचारून केलं. लग्नाचा दिवस ठरला. पैलतडीच्या आगरातून होड्या भरून येत होत्या. आबाच्या पोरीचं लगीन, मग कोण चुकणार? तार

माणसांनी फुलून गेली. रंगीबेरंगी लुगड्यांच्या बायका, सोन्याभटाची नटून आलेली सावी, काळा गॉगल घालून मिरविणारा, जानू नार्वेकर, परब, लोटलीकर सगळे मोगऱ्याच्या 'लग्नाक' जमले. जड नथ घालणारी मोगराची मावशी धावपळ करत होती. मांजरेकराच्या मामीची बडबड चालूच होती. साऱ्या भाटीचं व खोपटांचं गोकुळ झालं होतं. सारी आवराआवर झाली. लग्नाची घडी जवळ आली. भटजींनं मंगलाष्टकं म्हटली. अक्षता पडल्या. वाजंत्र्यांनी गजर केला. वधू-वरांनी वरमाला घातल्या. वऱ्हाडी माणसांची धावपळ चालूच होती.

वऱ्हाड निघालं. खोपटातील व वाडीतील पोरी-बाळी, म्हातारी-कोतारी मोगराला पोचवायला आली. बाया-बापड्यांना निरोप देताना मोगराचा कंठ दाटून आला. सोबतिणींना निरोप देताना मोगराचा जीव गलबलून गेला. मोगराकडे आबाला पहावेना. सकाळपासून आबाच्या डोळ्यांत अश्रुधारा होत्या. आबाचं लक्ष कशावरही नव्हतं. आबाचं घर रिकामं झालं होतं. आबाची समजूत घालणं साऱ्यांना कठीण जात होतं.

बहुतेक वऱ्हाडी माणसं पलीकडे पोहचली सुद्धा! नवरदेव नि त्याची मित्रमंडळी खास होडीतून पलीकडे पोहचली. मोगरा नि तिच्या सोबतिणी होडीत बसल्या. 'आबाऽऽ' मोगरानं हुंदका काढला. मोगराचे डोळे सुजले होते. बावलीनं होडी पाण्यात ढकलली. आबा थरथरत्या मानेनं पहात होता. आबाला सुमतीची आठवण झाली. डोळ्यांतील आसवं पुसण्याचं भान त्याला नव्हतं.

तारीवर माणसं विड्या पिण्यात मग्न होती. खोपटातील तरणी पोरं खुंटासारखी उभी होती. होडी संथ लयीनं चालली होती. झुळझुळणाऱ्या वाऱ्याचे तरंग पाण्यावर उठत होते.

आषाढसरी सुरू झाल्या. नव्या नवतीचा बहर आला. नद्यानाले भरून वाहू लागले. पावसाच्या सरी व भिवाची माणसं मोगरावर सारखाच प्रेमाचा वर्षाव करीत. सावळ्या सदैव मोगराबरोबर पिंगा घालायचा. सावळ्याचे चाळे भिवा व त्याची बाईल मोठ्या कौतुकानं पहात. लेकाला व नव्या सुनेला कुठं ठेवू, कुठं नको असं भिवाच्या बायकोला झालं. सावळ्याचे लाडीक हट्ट पुरविण्यात मोगराचा वेळ केव्हाच निघून जायचा!'

आठ दिवस पावसाची झड बसली. आबाची तब्येत बरी नसल्याचा सांगावा आला. मिळालेला निरोप घेऊनच मोगरा घरी आली. दोन दिवस आबाला उनउनीत पेज, चहा, अडुळशाची पानं घालून गरम केलेलं पाणी शिवाय डॉक्टरचं औषध होतंच. दोन दिवसात आबा बरा झाला. आबानं पोरीला सल्ला दिला, 'तुझी माणसं वाट पहात असतील, तू जा!' 'सांजच्याला जाईन!' मोगरानं मान डोलावली. 'सावळ्याकडे लक्ष दे, 'सासू-सासऱ्यांना जप!' आबाचा उपदेश.

'त्याची काळजी नको!' मोगरानं मोठाले डोळे करून आबाकडे पाहिलं.

पावसाची झड थांबली. निघताना शेजारच्या खोपटातील मावशीला हाक देत मोगरा म्हणाली, 'मावशेऽऽ! आबाला जप!' साऱ्यांचा निरोप मोगरानं घेतला. पोरी-बाळी, बाया-माणसं मोगराला पोहोचविण्यासाठी तारीपर्यंत आल्या. सांजची वेळ होती. नुस्ते खपवून परतलेल्या तीन-चार कोळणी होडीत बसल्या होत्या. खोपटातील दोन पोरं होडीत बसली. साऱ्यांनी मोगराचा निरोप घेतला. 'मोगरा, जा पोरी!' पाणवल्या डोळ्यांनी आबा बोलला. 'पावसाचा जोर वाढणार!' होडी पाण्यात ढकलत तांडेल म्हणाला. मोगरानं डोळे पुसले. 'आबा, जा तू परत!' मोगरानं आवाज दिला.

पाण्याचे लोट खाडीला पुढं रेटीत होते. पुरामुळं खाडी तुडुंब फुगली होती. तारीपासून होडी दूर जात होती. पाऊस नव्हता; पण वारा लाटांबरोबर स्वैर झाला होता. होडीची समजावणी करीत तांडेल वल्हवत होता. साऱ्यांचं बोलणं खुंटलं होतं, होडीला पाणी खेचत असल्याचा भास...तांडेल क्षणभर चलबिचल झाला. होडीतले डोळे आशाळभूतपणे तारीकडे पहात होते. अकस्मात लाट होडीत उसळली ..बायका गलका करून उभ्या राहिल्या ..नजरा भिरभिरल्या ...लाटेनं दुसरा तडाखा दिला . किंकाळ्या ...गटांगळ्या खाणारी . पाण्यावर तरंगणारी...डोकी . तारीवर तांडेलांची धावाधाव ..ओरड . व्यर्थ . कोणाला वाचवता आलं नाही . तांडेल पोहोत किनाऱ्याला लागला . त्याला चूक समजली . पण... साऱ्यांच्या जिवाचं मोल देऊन!

...स्वप्नांची जुळणी करीत आबा बसतो ...प्रत्येक संध्याकाळी स्वप्नमाला अधिकाधिक स्पष्ट होते...स्वप्नमालेत मोगरा ऐलतडी ना पैलतडी!

□


हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.

(रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८)

—डॉ. वा. ना. कुबेर

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर

प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन,

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

पुस्तके

# हॉन डॅट

## व्हिएतनामची समरगाथा

जगातलं कुठलंही स्वातंत्र्ययुद्ध हे मानवाच्या अस्तित्वाची, स्वत्वाची तीव्रतेने जाणीव करून देणारं ठरलं आहे. आम्हाला 'माणूस' म्हणून जगायचं आहे, नोकर म्हणून नाही, हे सत्य भारताच्या स्वातंत्र्ययुद्धातही आपला तेजस्वी किरण प्रज्वलित करणारं ठरलं आहे. या सर्वच स्वातंत्र्ययुद्धांमध्ये व्हिएतनामचे स्वातंत्र्ययुद्ध हा एक अजब प्रकार आहे. तो एक मुक्तिसंग्राम आहे. ती एक स्वातंत्र्यकविताच आहे, जिच्यातील प्रत्येक घटना, प्रत्येक प्रसंग मनाला मानवाच्या स्वत्वासाठी झगडण्याच्या जाणिवेची आठवण करून देतो.

व्हिएतनामचं स्वातंत्र्ययुद्ध हे खरंखुरं स्वातंत्र्ययुद्ध होतं, शस्त्रानिशी लढून आपला विजय सिद्ध करणारं युद्ध होतं. या युद्धात १९६१ साली दक्षिण व्हिएतनाममध्ये एकाच वेळी अनेक जिल्ह्यांतून सार्वत्रिक उठाव करण्यात आला. या सर्व घटनेचं कलात्मक चित्रण श्री. अॅन्ह डक यांच्या 'हॉन डॅट' या कादंबरीमध्ये वाचायला मिळतं. याच 'हॉन डॅट'चं मराठीत भाषांतर श्री. लक्ष्मण लोंढे यांनी नुकतंच केलं आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीलाच श्री. लोंढे लिहितात, 'अखेरीस व्हिएतनामचा लढा हा मानवाच्या मुक्तिसंग्रामाचा एक भाग होय. साऱ्या जगात इतरत्र जिथे जिथे मानवाचा मुक्तिसंग्राम चालू आहे, तिथे तिथे ह्या लढ्याचा अभ्यास झाला पाहिजे. अशा अभ्यासाचा त्या लढ्यांना फायदा होईल अशी माझी श्रद्धा आहे आणि ही श्रद्धाच या कादंबरीच्या भाषांतरामागची माझी प्रेरणा आहे.'

श्री. लोंढे यांची ही श्रद्धा योग्य असली तरी या कादंबरीपासून इतर काही फायदा होवो न होवो; पण अंगावर रोमांच उभे राहून किमान एक नवाच अनुभव या कादंबरीतून मिळतो, हे मात्र निश्चित! आणि म्हणूनच १९६० ते ६५ या कालखंडातील साहित्य व कलाक्षेत्रातील गुयेन दिन्ह चिऊ पारितोषिक श्री. अॅन्ह डक यांच्या या 'हॉन डॅट' या कादंबरीस मिळाले आहे.

व्हिएतनामच्या या स्वातंत्र्ययुद्धात जगातील आजच्या बलाढ्य आणि समृद्ध सत्तेशी शस्त्रास्त्रे, मनुष्यबळ आणि भौतिक प्रगती यात तुलनेनं फार मागे असणाऱ्या एका छोट्या आशियाई राष्ट्रानं भाग घेतला. त्यांच्याकडे स्वातंत्र्यप्राप्तीचं प्रबळ ध्येय होतं, प्रेरणा होती आणि त्याच्या बळावरच ते सतत विजय मिळवीत गेले आणि यशस्वी झाले. या युद्धात शस्त्रापेक्षा शस्त्र धारण करणारा 'माणूस' अधिक महत्त्वाचा असतो, हे सत्यही सिद्ध होतं.

कादंबरी वाचायला घेतली की, त्यामधील साऊ, कुवेन, सू, बाकी, झॅम, बा रेन, गॅन ही सगळी माणसं आपल्या अवती-भवती वावरायला लागतात. आपण अलिप्ततेने त्यांच्यात मिसळतो आणि त्यांच्या या आदिम इच्छेपुढे नमून जातो. ही सर्व व्हिएतनामी दोस्तमंडळी आपला जीव धोक्यात घालून, आपलं सर्वस्व पणाला लावून आपल्या देशासाठी लढताहेत, हे अनुभवताना कादंबरी कधी संपते ते कळतही नाही. मला वाटतं, या कादंबरीचं हेच यश आहे.

'हॉन डॅट' या गावात घडणारी ही कादंबरी कौटुंबिकता, सामाजिकता, राजकीयता, प्रेमभाव, एकी या सर्वच गोष्टींचं एक निस्सीम दर्शन इथं वाचायला मिळतं.

इथली 'सू' ही लग्न झालेली बाई. तिला थुय नावाची मुलगी आहे. तिचा नवरा उत्तर व्हिएतनाममध्ये आहे, तरीही ती मात्र या स्वातंत्र्ययुद्धात भाग घेते.

आपल्या सैनिकांसाठी (ते सैनिक नव्हतेच., ते योद्धे! सैनिक या शब्दाला 'पगारीपणा' चा एक वास येतो.) ती हॉन डॅटच्या गुहेत जाते. थुय आणि बहीण कुएनही तिच्या सोबत आहेत. गुहेत पाण्याचा प्रश्न येतो तेव्हा सू धैर्याने नाईल नदीतून पाणी आणण्यास पुढाकार घेते; पण तेव्हा ती पकडली जाते आणि शत्रूकडून ठार मारली जाते. त्यापूर्वी आपल्या गुहेतील बांधवांना उद्देशून ती म्हणते, 'कॉम्रेडस्, त्याच्यावर विश्वास ठेवू नका! ते खोटं बोलताहेत, मी त्यांना कधीच शरण जाणार नाही...तुम्ही शस्त्रे खाली ठेवू नका!' हे असं असामान्य धैर्य असणारी एक स्त्री आपल्या स्वातंत्र्यासाठी जेव्हा आहुती देते तेव्हा अंगावर रोमांच उभा राहतो.

या स्वातंत्र्यानं प्रेरित झालेल्या योद्ध्यांची ही समरगाथा. यामध्ये जनतेच्या अंगी एक अद्भुत शक्ती संचारते आणि अशी जनतासंख्या आणि शस्त्रास्त्रे यामुळे भीती वाटावी एवढ्या मोठ्या राक्षसी सेनेसमोर वेडरपणे उभी ठाकते. यामागे एक वेगळीच अद्भुत प्रेरणा आहे. ती प्रेरणा त्यांना युद्धास प्रेरित करते. जगण्याचं ध्येय सांगते, जीवनाचं सार्थक सांगते. अशी प्रेरणा जनतेमध्ये निर्माण होणे, करणे याबाबतीतला दक्षिण व्हिएतनामी नेत्यांचा आदर्श वाखाणण्यासारखाच आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीलाच लिहिलंय की, या कादंबरीतील बऱ्याच व्यक्ती आजही जिवंत आहेत आणि आपल्या पराक्रमाने अशी अनेक 'हॉन डॅट 'हूनही अधिक नेत्रदीपक आणि तेजस्वी कथानकं त्या आजही घडवीत आहेत.

'हॉन डॅट' या कादंबरीचं एक वैशिष्ट्य म्हणजे, ती संपूर्ण सत्य आहे आणि त्यामुळेच इथल्या प्रसंगांना, घटनांना आपल्याला सामोरं जाणं भाग पडतं. या कादंबरीत एका समाजजीवनाचं विस्तृत पण कलात्मक दर्शन घडतं. यातला ऊट हा दहा वर्षांचा मुलगाही शत्रूचा हातबाँब पळवून, 'मी युद्ध करणार!' असं म्हणतो, तर शत्रूचा नेता झॅम याची आई ही त्याच्याविरुद्ध बंड करताना दिसते. ही सगळी हॉन डॅटमधील खेडूत मंडळी. कुंभार, दुकानदार, लोहार, विद्यार्थी अशा निरनिराळ्या स्तरांतले लोक यात आपल्याला भेटतात. अर्थात युद्धकाळात त्यांचं दैनंदिन जीवनही चालू आहे—प्रेमप्रकरणंही रंगत आहेत; पण हे करीत असतानाही देशाच्या स्वातंत्र्याचा विचारही त्यांच्या मनात घर करून बसलेला आहे, त्यांच्या जीवनाचा तो एक अपरिहार्य भाग बनला आहे.

या कादंबरीत कोणी नायक-नायिका नाही, यातील सर्वच व्यक्ती महत्त्वाच्या आहेत. ही क्रांती करणारे सर्व नागरिक हेच

या कादंबरीचे 'हिरो' आहेत. यातील प्रत्येकाचं जिवंत दर्शन घडविण्याचा उत्कृष्ट प्रयत्न अॅन्ह डक यांनी केलाय. त्या व्यक्ती सजीव होतात, आपल्याला भेटतात आणि शब्दांचं आणि आपलं नातं आपण विसरून जातो मग माणूस माणसाला भेटतो. माणसामाणसातील प्रेम, सहानुभूती आणि एकजूट मन हेलावून सोडतं.

श्री लक्ष्मण लोंढे यांनी मराठीत केलेला अनुवादही चांगला आहे. मुख्य म्हणजे कादंबरीतील मूळ आशय भाषांतरातून संक्रमित होताना कुठेही कमी झालेला नाही, हेच त्यांच्या भाषांतराचं एक मोठं वैशिष्टय आणि यशही म्हणावं लागेल.

-मुकुंद संगोराम

हॉन डॅट

मूळ लेखक : अॅन्ह डक
अनुवाद : लक्ष्मण लोंढे
अभिनव प्रकाशन, दादर, मुंबई
पृष्ठे : ३५२, मूल्य : २५ रुपये.

# विमुक्त जन

## सामाजिक परिवर्तनातलं नवं पाऊल !

तशी मराठी नियतकालिकांमध्ये साप्ताहिकं, पाक्षिकं, मासिकं, त्रैमासिकं किंवा अगदी वार्षिकंसुद्धा, यांची भाऊगर्दी काही कमी नाही. नवीन नियतकालिक काढणारा प्रत्येक संपादक आपण काही तरी खास उद्देशाने हे नियतकालिक काढत आहोत, अशी सुरुवातीला जोरदार आरोळी ठोकतो; पण नंतर हळूहळू याच भाऊगर्दीत बुडून जातो.

या पार्श्वभूमीवर औरंगाबादच्या वसंतराव नाईक महाविद्यालयातील एक प्राध्यापक श्री. सुरेश पुरी यांचं 'विमुक्त जन' हे नवीन त्रैमासिक निश्चितच लक्ष वेधून घेतं. यंदाच्या वर्षीच या त्रैमासिकाचा पहिला अंक जूनमध्ये प्रसिद्ध झाला (एप्रिल, मे, जून). या अंकाच्या संपादकीयातच प्रा. पुरी यांनी असं म्हटलंय की, 'औरंगाबादच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात अध्यापन करीत असताना दऱ्या-खोऱ्यांतील, राना-वनातील विमुक्त भटक्या आणि आदिवासी समाजातील शेकडो विद्यार्थ्यांशी निकटचे संबंध आले. या विमुक्त-भटक्या-आदिवासी मुलांच्या, त्यांच्या समाजाच्या शेकडो समस्यांच्या विचाराने मी सतत अस्वस्थ होत गेलो. मनाची ही अस्वस्थता, बेचैनी दिवसेंदिवस वाढतच राहिली. या भटक्या-विमुक्त-आदिवासींच्या विविध जटिल समस्या समाजासमोर आणि शासनासमोर मांडून त्या सोडवण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्नशील होण्याच्या विचारप्रक्रियेतून 'विमुक्त जन'चा जन्म झाला.' अशा तऱ्हेने काही तरी निश्चित, ठोस उद्देश आणि कार्यक्रम हातात घेऊन फारच थोडी नियतकालिकं उदयाला येतात.

साहजिकच 'विमुक्त जन'चा पहिला अंक हा 'बंजारा विशेषांक' म्हणून प्रसिद्ध झालेला आहे अंकामध्ये पहिलाच वाचनीय लेख आहे, श्री. दौलतराव भोसले यांचा. या लेखामध्ये श्री. भोसले यांनी भटक्या-विमुक्त जातीचे प्रश्न सविस्तरपणे, आकडेवारीसह मांडले आहेत. त्यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या मूलभूत गरजांपासून केंद्र शासनाने मान्य केलेल्या हरिजन—गिरिजनांच्या यादीमध्ये या बंजारा समाजाचा समावेश नसणे, इथपर्यंतच्या बंजारा समाजाच्या विविध स्वरूपाच्या समस्यांची चर्चा श्री. भोसले यांनी केली आहे. तसंच या समाजाला संघटित करण्यासाठी व उपलब्ध सोई-सवलतींचा लाभ मिळवून देण्यासाठी समाजातील सर्व समतावादी आणि मागासवर्गांच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांनी एक राजकारणनिरपेक्ष व्यासपीठ निर्माण करून त्याद्वारा हे काम केलं पाहिजे, असा उपायही सुचवला आहे. 'बंजारा समाजाची सामाजिक परिस्थिती' हा प्रा. दा. धों. काचोळे यांचा लेखही विविध तांड्यांवरील ८० बंजारा कुटुंबांच्या प्रत्यक्ष मुलाखतींमुळे वाचनीय ठरतो. बंजारा समाजाचा मूळ उगम, स्त्रियांकडे पाहण्याचा या समाजाचा दृष्टिकोन, हुंडा, बाल-विवाह, लग्न-सोहळा, पुनर्विवाह, धार्मिकता, जातिभेद, यासारख्या बंजारा लोकांमधील विविध इष्टानिष्ट चालीरीती या सगळ्या गोष्टींचा 'आँखो देखा हाल' या लेखात वाचायला मिळतो. सौ. चंद्रकला नाईक यांचा 'बंजारा स्त्री : काल, आज आणि उद्या' हा बंजारा स्त्रीबद्दलचा माहितीपूर्ण लेख, त्यातील बंजारा स्त्रीच्या गमतीदार वैशिष्टयांसकट उल्लेखनीय आहे. उदाहरणार्थ, ही बंजारी स्त्री लग्नानंतर सासरी जाताना इतर स्त्रियांसारखीच रडते; पण ती गाऊन रडते. त्याला 'ढावलो' म्हणतात आणि त्या गाण्यातून ती आपल्या आई-वडिलांना असं आश्वासन देते की, रांगो धातूला गरम केल्यावर जसा त्याला आकार दिला जातो, जसा होतो तसे मीदेखील ठेवतील तसे राहीन; चांदी तापल्यावर कुरकुर न करता तापते व जो आकार द्यावा तो घेते, तसे मीदेखील जी भूमिका देतील ती पार पाडायला आनंदाने तयार आहे. इतकंच नाही तर ज्याप्रमाणे दोरा सुईच्या नाकातून सरळपणे जातो तशीच मी पण सरळ वागेन. तुमचं नाव वाईट होईल असे वागणार नाही !

याव्यतिरिक्त प्रा. एफ्. एच्. बेन्नूर यांचा 'बंजारा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न', प्रा. काशिनाथ राठोड यांचा 'बंजारा समाजाच्या आर्थिक समस्या', श्री. विष्णुदत्त शास्त्री यांचा 'बंजारा गीतांमधील सांस्कृतिक चेतना' हे लेखही उल्लेखनीय आहेत.

'उगवत्या सूर्याची लाख किरणं
नाहीत आमची
उसळत्या दरियाची फेसाळ गाज
फक्त आमची
दिवाळीची तेजाळ रोषणाई
कुठे आम्हाला ?
होळीच्या पेटत्या ज्वाळाच
तेवढ्या आम्हासाठी'

ही मृणाल चिंचाळकरांची कविता आणि राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात चमकत असलेल्या बंजारी समाजातील व्यक्तींचा मोजका परिचय ही या अंकाची आणखी काही वैशिष्टये ! !

'विमुक्त जन'चा दुसरा अंक सप्टेंबरमध्ये प्रसिद्ध झाला (जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर). हा अंक कैकाडी समाज विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला. तसेच अंक तयार होत असतानाच प्रसिद्ध सत्पुरुष कैकाडीमहाराज यांचे देहावसान झाल्याने अंकालाच कैकाडी-

महाराजांवर आधारित अशी खास श्रद्धांजली-पर पुरवणी जोडली आहे. त्यामुळेच अंकातील श्री. ना. वा. माने यांनी लिहिलेल्या पहिल्या लेखात कैकाडीमहाराजांचे चरित्र आणि कार्य थोडक्यात विशद केलेले आहे.

अंकातील श्री. म. य. दळवी यांचा 'या साऱ्यांसाठी ना लोकशाही, ना समाजवाद !' हा लेख हृदय पिळवटून टाकणारा आहे. कारण या लेखात श्री. दळवी यांनी कोणताही विचार मांडलेला नाही; फक्त या भटक्या जमातींवर होणाऱ्या अत्याचारांच्या कहाण्या एकापुढे एक वाचकांसमोर ठेवल्या आहेत आणि त्यांमधून वाचकालाच विचार करायला लावलं आहे. 'नरेच केला हीन किती नर' या (कु) भाषितांच्या सत्यतेचा ! मराठवाडा दंगलीचं सावट या अंकावर पडल्यावाचून राहिलेलं नाही. म्हणूनच प्रा. बापूराव जगताप यांचा 'मराठवाडा दंगलीचे प्रातिनिधिक गाव : सुगाव' हा लेख श्री. दळवी यांच्या लेखाप्रमाणेच फक्त दंगलीतील अत्याचारांच्या कहाण्या सांगणारा आणि त्यातून विचार करायला लावणारा आहे.

या दोन लेखांप्रमाणेच श्री. गणपतराव गायकवाड यांचा 'महाराष्ट्रातील कैकाडी समाज' आणि प्रा. सुखदेव थोरात यांचा 'महाराष्ट्रातील कैकाडी समाज, एक पहाणी' हे दोन लेख विशेष उल्लेखनीय आहेत. दोन्हीही लेखकांनी अत्यंत अभ्यासूपणे, आकडेवारीसह, विविध ग्रंथांचे आधार देत हे लेख माहितीपूर्ण बनविले आहेत.

याचबरोबर श्री. प्र. ई. कांबळे यांचा 'माझे कैकाडी बांधव आणि मी' हा लेख, श्री. नागनाथ कोतापल्ले यांची '.मया' ही कथा, कैकाडी समाजातील राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा परिचय हेही वाचनीय आहेत.

काव्यांच्या क्षेत्रातही हा अंक मागे नाही. 'विमुक्त जन'च्या पहिल्या अंकात श्री. मृणाल चिंचाळकरांची कविता होती; पण त्यामध्ये एक प्रकारची असहाय, पराभूत वृत्ती डोकावत होती. या दुसऱ्या अंकातील प्रा. बापूराव जगताप यांची कविता मात्र फारच सरस आहे. त्यात आशावाद तर आहेच; पण त्याबरोबरच विजयाची ईर्षाही आहे. प्रा. जगताप आपल्या 'मुक्तिसंग्राम, ७८' या कवितेत म्हणतात—

'बंधूंनो सलाम ! गाववाले सलाम !
पण शेवटचा नाही.
या सीमेपार धगधगतोय सूर्य
तो घ्यायला चाललोय
या डोंगराच्या पलीकडे रोरावतायत् वादळं
ती आणायला चाललोय्
पोराबाळांसह चाललोय्, लेकी-सुनांसह
चाललोय्
उद्या जन्मणाऱ्या पिढीसह चाललोय्
सलाम घ्या बंधूंनो सलाम !
गाववाले सलाम !
पण शेवटचा नाही.
एक दिवस परतणार आहोत
चिरेबंदी घरांना घेऊन परतणार आहोत
आमच्या मातृभूमीला घेऊन परतणार
आहोत
सोबत तलवार आणि बंदुकही घेऊन
परतणार आहोत
तेव्हा बाहूला बाहू भिडणारच आहे
आमच्या हातून गुन्हाही घडणार आहे
बंधूंनो !
जमलंच तर पहिलं स्वातंत्र्य-युद्धही
झडणार आहे
जमलंच तर पहिलं स्वातंत्र्य-युद्धही
झडणार आहे.

अत्यंत स्वच्छ, सरळ, सुबोध शब्दांत मांडलेलं क्रांतीचं हे स्वप्न आजच्या दलित साहित्यातील दुर्बोधता आणि बीभत्सतेच्या चिखलामध्ये निश्चितच उठून दिसतं.

एकंदरीत 'विमुक्त जन'च्या या दोन विशेषांकांनी अंकाबद्दलच्या अपेक्षा निश्चितच खूप वाढविल्या आहेत. यापुढील अंकही 'विमुक्त जन'च्या तत्त्वाशी बांधिलकी राखणारे असे मसणजोगी, घिसाडी, गोंधळी, नंदीवाले यांच्या समाजजीवनावर आधारित आहेत. त्यामुळे थोड्याच काळामध्ये सामाजिक प्रबोधनाचं मुखपत्र म्हणून या त्रैमासिकाने लौकिक मिळविल्यास त्यात काहीच वावगं असणार नाही.

—सतीश कामत


**तीन राजहंस प्रकाशने**

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**आणि ड्रॅगन जागा झाला**

लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**

लेखक : अरुण साधू । मूल्य : सात रुपये

**पूर्णिया**

लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

# भावे नाटयमंदिराची दुर्दशा

श्री. ग. सबनीस

कोल्हापूर हे ज्याप्रमाणे 'कलापूर' म्हणून नावाजलेले आहे त्याचप्रमाणे सांगली बहुत चांगली हा सांगलीचा लौकिक शिक्षण, व्यापार-उदीम यांच्याबरोबरीने 'नाटयकलेचे आगर' म्हणून अखिल महाराष्ट्रात गाजला होता व आजही थोडा-फार शिल्लक आहे. नाटचाचे आद्यजनक कै. विष्णुदास भावे, नाटचाचार्य कै. काकासाहेब खाडिलकर, कै. देवल, कै. कमन्नूरकर व श्री. वसंत कानेटकर आदी नाटककार सांगलीचे! शिवाय, सर्वश्री मामा पेंडसे, चित्तरंजन कोल्हटकर, प्रा. यशवंत केळकर, माधव खाडिलकर आदी पुण्या-मुंबईच्या रंगमंचावरच नव्हे, तर दिल्लीपर्यंत मराठी रंगभूमीचा झेंडा वैभवाने फडकविणारे नाटचकलावंत सांगलीचेच सुपुत्र आहेत. तसेच, कै. दीनानाथ व कै. बालगंधर्व या नटश्रेष्ठांची नाटके सांगली मिरजेला जुन्या काळी वारंवार होत. यामुळे, कै. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी १९४३ ला इथे झालेल्या नाटचशताब्दीमहोत्सवाच्या अध्यक्षीय भाषणातून सांगलीचा 'नाटचपंढरी' असा गौरवपूर्ण उल्लेख मोठ्या अभिमानाने आवर्जून केला होता. त्याच वेळी सांगली संस्थानचे कै. चिंतामणराव पटवर्धन यांच्या प्रेरणेने इथे मराठी नाटचपरिषदेच्या ठरावान्वये साहित्यसम्राट कै. न. चिं. तथा तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली अखिल महाराष्ट्र नाटचविद्यामंदिर नावाची नाटचकलेला संपूर्ण वाहिलेली संस्थाही स्थापन झाली.

सर्वश्री कै. गणपतराव गोडबोले वकील, कै. रावसाहेब वासुनाना भाटे, सांगली स्टेट इंजिनिअर कै. दादासाहेब खाडिलकर, कै. ज. वा. पाटणकर, कै. बंकटलाल सारडा, कै. गंगुनाना कानेटकर व श्री. सदाशिवराव फडके वकील आदी नाटचप्रेमी व विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती या संस्थेच्या कार्यकारणीत होत्या. याशिवाय माजी सभापती वि. स. पागे, कै. बाळासाहेब लिमये फोटोग्राफर, कै. बाळासाहेब भट, कै. इनामदार, सर्वश्री विनायकराव पाटणकर, बाबूराव नाईक इत्यादी मंडळी संस्थेचे उत्साही सदस्य होते. विशेष उल्लेखनीय घटना म्हणजे सांगलीच्या राजेसाहेबांनी सांगली हरभट रोड या मध्यवर्ती वस्तीतील जवळजवळ १ लाख चौरस फुटांपेक्षा जास्त परिसर संस्थेला अक्षरशः मोफत बहाल केला. इतकेच नव्हे तर पुढे त्या ठिकाणी 'भावे नाटच मंदिर' बांधणीसाठी दहा हजार रुपयांची रक्कम, बांधकामाला लागणारे पत्रे इ. लोखंडी सामान मुक्तहस्ताने दिले. संस्थेच्या या जागेची आयुर्विमा महामंडळाने नुकतीच केलेली किंमत १२ लाख आहे.

अर्थात १९४३ ते १९४९ पर्यंत हा परिसर ओसाड होता; पण १९४९ च्या सुमारास नाटचप्रेमी कै. एस. ए. कुलकर्णी व कै. दादा खाडिलकर यांनी नाटचसंस्थेमार्फत नाटचस्पर्धा सुरू केल्या. त्या तीन वर्षे चालल्या; पण नाटचविद्यामंदिर अथवा भावे नाटचगृह इथे प्रगतीच्या दृष्टीने विशेष जिद्दीने कोणी परिश्रम केले नसावेत! त्या पूर्वी बरीच वर्षे सांगली शिवाजीनगर भागातील काही उत्साही बाल व तरुण कलावंत मंडळींनी बाल हनुमान मंडळ नावाची संस्था स्थापन केली होती. ती उत्साही मंडळी दर गणपती-उत्सवात मोठी मेहनत घेऊन उत्कृष्ट नाटचप्रयोग सादर करीत. त्यात सर्वश्री अनंतराव फडके, रघुनाथ गोखले, पापा वसगडेकर, बाळ मुळे, व कै. राम कुर्ले टेलर आदी हौशी नाटचकलावंत होते. १९५४ चा रंगभूमीदिन थाटात साजरा करण्याची जबाबदारी अ. म. नाटचविद्यामंदिर संस्थेच्या कार्यकारिणीने या हौशी कलावंतांवर सोपविली. ती त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. सांगली जिमखान्यात नाटचाचा 'स्त्री-विभाग' सुरू झाला. भावे नाटचमंदिरात भव्य मंडप घालून 'आग्र्याहून सुटका' (बाल हनुमान) 'बेबंदशाही' (के. जी. मराठे, न. चिं. ताम्हनकर) इ. प्रवेश सादर केले गेले व नेटका, देखणा, असा १९५८ चा रंगभूमीदिन साजरा झाला.

१९५५ च्या सुमारास बाळहनुमानची सर्व नाटचकलावंत व नाटचप्रेमी मंडळी भावे नाटचमंदिर या संस्थेत सामील झाली. १९५६ मध्ये संस्थेने सरकारी नाटचस्पर्धेसाठी 'तोतयाचे बंड' नाटक बसविले. ते खूप गाजले. त्यानंतर आर्टिस्ट बाबुराव गोखले, श्री. राजाभाऊ जगदाळे, अरुण नाईक, म. बा. करमरकर इ. विविध क्षेत्रांतील व्यक्ती नाटचसंस्थेत रस घेत होती.

कै. तात्यासाहेब केळकरांचेनंतर कै. काकासाहेब गाडगीळ, कै. गंगुनाना कानेटकर काही वर्षे संस्थेच्या अध्यक्षपदी होते. १९५९ मध्ये कै. शंकरराव किर्लोस्कर अध्यक्ष झाले, ते १९६४ पर्यंत अध्यक्ष होते. त्यानंतर कै. रावसाहेब भावे इंजिनियर अध्यक्ष, खजिनदार श्री. गणपतराव आरवाडे व कार्यकारिणीत कै. ज. वा. पाटणकर, श्री. आबासाहेब पाटणकर, बंकटलाल सारडा इ. मंडळी होती. याच सुमारास कै. विष्णुदास भावे कलाविभाग सुरू झाला व 'उद्याचा संसार', 'देवमाणूस', 'जग काय म्हणेल ?' 'तुझं आहे तुजपाशी', 'श्रीमंत', 'मी होतो राजा पृथ्वीचा', 'झुंझारराव', 'कीचकवध', 'करीन तो पूर्व', 'नट तो नृप', 'लग्नाची बेडी', 'सौभद्र', 'भाऊबंदकी' इ. नाटके हौशी कलावंतांनी उत्साहाने सादर केली. विभागीय बक्षिसे मिळविली. सुदैवाने नाटचस्पर्धेत भाग घेण्याची परंपरा आजही सातत्याने सुरू आहे.

त्या वेळी सांगलीला एकही नाटकाचे थिएटर नव्हते. साधे स्टेज, तट्टयाचे केलेले-बाहेरून कनाती असे 'ओपन एअर' थिएटर होते. १९५६-५७ च्या सुमारास सर्वश्री जनुभाऊ गोडबोले, बाबुराव दांडेकर, प्राचार्य कानिटकर, कै. वासुनाना भावे, एंजिनियर

तसेच वालचंद कॉलेजचा एंजिनिअरिंग स्टाफ व कामगार या सर्वांच्या परिश्रमापासून व कै. राजेसाहेब पटवर्धन यांच्या उदार मदतीतून भावे नाट्यमंदिर–वास्तूच्या चार भिंती उभ्या राहिल्या. पुणे–मुंबईचे नाट्यप्रेमी प्रेक्षक या रंगमंचावर खूप आहेत.

१९५७–५८ मधील गोष्ट. कै. पृथ्वीराज कपूरांची नाटके सदासुख सिनेगृहात महिनाभर चालली होती. एका संध्याकाळी भावे नाट्यमंदिराचा विस्तीर्ण व झाडांची छाया लाभलेला रम्य परिसर त्यांनी पाहिला. त्या नटश्रेष्ठांना तो इतका आवडला की ते रोज संध्याकाळी तेथे तासभर येत. त्यांनी नाट्यमंदिर–सदस्यांना सुनविले की, ‘ इतकी प्रशस्त व प्रसन्न अशी नाट्यमंदिराची वास्तु मी अजून पाहिली नाही. या जागेपैकी एक तसूभरही जागा नाट्यकलेखेरीज इतर कामाला देऊ नका !.’ पण ही दूरदृष्टीची सूचना संस्थेच्या कार्यकारिणीने मानली नाही हे दुर्दैव आहे.

सांगलीला १९६५ मध्ये कै. केशवराव दाते यांचा अमृतमहोत्सव मोठ्या थाटात अविस्मरणीय असा झाला. पुण्या-मुंबईचे सर्वस्वी भालचंद्र पेंढारकर, मामा पेंडसे, चित्तरंजन कोल्हटकर, मा. दत्ताराम, विजया मेहता आदी श्रेष्ठ कलावंत पंढरीच्या वारीला जातात त्या नाट्यभक्तीभावाने येथे आले. त्या अमृतमहोत्सवांत सहभागी झाले. नाट्यप्रयोग झाले. त्यांची मिळकतही संस्थेलाच अर्पण केली. वि. स. खांडेकर आजारी असूनही केवळ नाट्यभक्ती व सांगलीप्रेम यामुळे आले. राजेसाहेबांचे अध्यक्षतेखाली केशवराव दाते व सर्व कलावंतांचा भव्य सत्कार झाला. उत्कृष्ट भाषणांची मेजवानी श्रोत्यांना मिळालीच; डोळ्यांचे पारणे फिटावे व अभिनयाने मन तृप्त व्हावे असे नाट्यदर्शन प्रेक्षकांना घडले; पण भावे नाट्यमंदिराचा तो अखेरचा वैभवकाळ ठरला !

त्यानंतर म्हणजे १९६६ पासून १९७८ अखेरचा काळ म्हणजे, भावे नाट्यमंदिर संस्थेच्या अधःपतनाचाच काळ होय ! अंतर्गत भाऊबंदकी, व्यक्तिप्रतिष्ठेचे अवास्तव स्तोम यामुळे विष्णुदास भावे या पवित्र नावाचे क्रूर विडंबन झाले आहे. संस्थेतील काही माणसे भलत्या प्रतिष्ठेची दुराग्रही, कायद्याचा कीस पाडण्यात सदैव स्वतःला धन्य मानणारी ! त्यामुळे नाट्यप्रेमी प्रेक्षकांची उपेक्षा नाहक सुरू आहे! आवाजाचे नैसर्गिक वरदान लाभव उत्कृष्ट रंगमच असलेल्या या भावेमंदिर नाट्यगृहात नाटके क्वचितच लागतात ! एखाद्या शिक्षणसंस्थेने ‘ येथे शिक्षणाखेरीज सर्व काही मिळते ! ’ असा फलक लावावा तसे ‘ भावे नाट्यमंदिर ’ परिसरात नाटकाखेरीज कापडाचे प्रदर्शन, फोटो, प्रेस, इलेक्ट्रिकची दुकाने, गॅरेज, लिलाव लग्नसमारंभ, पार्किंग इ. सर्व काही सर्रास सुरू आहे. नाट्यपंढरीच्या या दुर्दशेला जबाबदार कोण ? हा निरस, जुनापुराणा वाद बारा वर्षांनी तरी कायमचा संपुष्टात यावा व खऱ्या अर्थाने नाट्यकलेची उपासना करणारी रंगभूमीची वास्तू म्हणून नाट्यपंढरी पुन्हा महाराष्ट्रात दुमदुमत रहावी अशी माझ्यासारख्या हजारो नाट्यप्रेमी प्रेक्षकांची आंतरिक तळमळ व तीव्र व्यथा आहे ! पण उंदरांच्या सभेत मांजराच्या गळ्यात घटा बांधायची कुणी ?

नगरपरिषदेचे जनतानाट्यगृह नावाचे अलीशान, अद्यावत् खुर्च्या आदी सोयींनी सुसज्ज नाट्यगृह आहे; पण तेथे दर भरमसाट असूनही पहिल्या गॅलरीतून पात्रे बाहुलीएवढी दिसतात व पुढील चार-पाच रांगा सोडल्या तर, संवाद नीट ऐकू येत नाहीत. त्यामुळे चांगली नाटके आली तरी सांगलीच्या प्रेक्षकांना इच्छा असूनही, ती रंगत नसल्याने पहावीत असे वाटत नाही. एक थिएटर चांगले; पण तेथे नाटके लागत नाहीत तर दुसऱ्या थिएटरमध्ये नाटके रंगत नाहीत; पण हटकून तेथेच प्रयोग लागतात ! एकूण चणे आहेत तेथे दात नाहीत व दात आहेत तेथे चणे नाहीत हेच खरे ! ही नाट्यपंढरीची आजची शोककथा आहे. शासकीय पातळीवरून अथवा जनताजनार्दनाच्या कृपेने एखादी विलक्षण नाट्यपूर्ण घटना नजीकच्या भविष्यात घडली तरच नाट्यपंढरीची ही शोकांतिका टळेल.

रंगभूमी

# अनुबंध

**मानसिक संघर्षाचे बंध !**

वर्कशॉप आर्ट सेंटर या नवीन स्थापन झालेल्या नाट्यसंस्थेचा ‘ अनुबंध ’ या प्रथम नाट्याचा प्रयोग छबिलदास मुंबई येथे करण्यात आला.

नाट्यसंस्था नवीन असल्यामुळे त्या प्रसंगी जनताजनार्दनाचा आशीर्वाद वगैरे, हक्कानं काही तरी मागायला आलोत, लोभ असावा व (जमल्यास) पुढे वाढावा असे नमन असणारी पुस्तिका वाटण्यात आली पुस्तिकेतील सहा पानांपैकी दोन पाने नमन बाकी कॅमेरा वगैरेंच्या जाहिराती. असो. प्रायोगिक चळवळीला हातभार हेही नसे थोडके.

डॉ. इंद्रपार्थसारथी यांच्या मूळ नाटकाचा डॉ. भगवानदास वर्मा यांनी केलेला हा अनुवाद आहे. मूळ लेखकाच्या लिखाणातील ‘ जर्म ’ कायम ठेवून त्याला अनुसरून असणारी समर्पक (eauivalent) शब्द योजना सौंदर्य अबाधित राखू शकली आहे; पण त्या प्रयत्नात शब्द तोलण्याच्या नादात लिखाणास चर्चात्मक स्वरूप आले आहे. विशेषतः सुरुवातीस हे फार जाणवते.

एक विधुर प्रोफेसर, त्याची मुलगी निर्मला, घरापासून दूर निघून गेलेला भाऊ ही स्थायी नाट्य घडविणारी पात्रे आणि प्रोफेसरांवर उपचार करणारे नाट्यनिर्देशक पात्र या चौघात कथाभाग वळणं घेतो. या चौघात एक मानसिक संघर्ष आहे. प्रोफेसर निर्मलाचं लग्न करण्यास अनुत्सुक आहे. त्यामुळे निर्मलाच्या जीवनात लहडलेला वसंत अस्तित्व शोधण्यात घुसमटलेला आहे. घराबाहेर राहाणारा प्रोफेसरांचा मुलगा व प्रोफेसर यांचा स्वभाव अहंकारी आहे व चौथे पात्र डॉक्टर हा घटस्फोटित. आता लोककल्याणार्थ जीवन व्यतीत करणारा; परंतु प्रोफेसर व त्यांच्या वैयक्तिक घटनात डोकावूनसुद्धा निर्मलाच्या मनाची उकल न सोडवू शकलेला माणूस आहे. असे हे संपूर्ण मानसिक पातळीवरील संघर्ष जरी खूप खोलवर जाणारे असले तरी भावनांच्या

इंद्रधनुष्यात रेंगाळलेले आहेत. निर्मला, प्रोफेसर व त्यांचा मुलगा, यांचा एकमेकांना आलेला वीट, त्यातून निर्माण होणारी चीड, द्वेष, अस्वस्थता परंतु अत्यंत सत्य व अंतिम जीवनदायी आधार असलेला अनुराग या साऱ्यांचे बंध या अनुबंधात. हा झाला नाटकाचा ढोबळमानाने आराखडा.

साहजिकच संघर्षकेंद्र भूमिका निर्मलाची आहे. ती स्वाती टिपणीस यांनी केली आहे. नाट्यसंस्था नवीन असली तरी बऱ्यापैकी अनुभव असलेली मंडळीच उभी केली आहेत. प्रोफेसर–मधु वगळ आणि मुलगा श्री. दिलीप कुलकर्णी. या सर्व पात्ररचनेतील एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचे वेगवेगळे वाटणारे आवाजांचे पीच (Pitch). याला डॉक्टर झालेले प्रदीप प्रधान सुद्धा मदत करतात. 'Absolutely right' असं ठणकावून बजावणारा सीरियस हार्ट पेशंट जरा खटकतोच. प्रोफेसर या पात्रात जीवनातील अपयशाची व शिवाय भरीस भर म्हणून मुलीच्या द्वेषाची अस्वस्थता आहे. आणखी महत्त्वाचे म्हणजे सर्व पात्रांचे विस्कटलेले जीवनप्रवाह हे कुणा एकाच्या कृतीने न होता परिस्थितीजन्य आहेत. ही सर्वात मोठी अस्वस्थता अत्यंत कटु परंतु सत्य भोगावयास लावणारी आहे. नुसत्याच खुर्चीच्या हातावर अस्वस्थपणे फिरणारा हात किंवा बोटांची चाळवाचाळव इतकी वरकरणी (Superficial) ती खचितच नाही. त्यामुळे प्रोफेसर या पात्राची कथेतील संघर्षगती मंदावली आहे. त्यांचा अभिनय जबरदस्त छापातील वाटला. श्री. दिलीप कुलकर्णी यांनी उभे केलेले पात्र कथाबीजात खोलवर जात नाही. त्यामुळे संघर्ष एकाच समपातळीवर रेंगाळतात. स्वाती टिपणीस यांची निर्मला नीटस वाटली. डोळ्यांचा (looks चा) सुरेख वापर व हालचाली सुंदर वाटल्या. दिवे गेल्यानंतर मेणबत्तीतील प्रवेश व शेवटचा सीम उत्तम आहेत.

दिग्दर्शन व नेपथ्य श्री. विजय बोन्द्रे यांनी केलेले आहे. नेपथ्यातील रंगसंगती व सेट वैविध्यपूर्ण आहे. रंगछटांचा सुरेख वापर केलेला आहे; परंतु डॉक्टर व निर्मला यांच्या संवादात किंवा प्रवेशात वाजवीपेक्षा जास्त रचनात्मक जवळीक ( viscinity between the characters ) झाल्याचे जाणवते. दुसरे असे की, पावसाचा कथेत झालेला गूढ वातावरणीय उपयोग रंगमंचावर फारच कमी परिणामकारक आहे. त्यामुळे संघर्षातील संदिग्धता वाढते.

दुसरे खटकणारे महत्त्वाचे म्हणजे संगीताचा अति वापर. त्यामुळे संघर्षातील एकसंध साखळी सारखी सुटते. संगीत जरी चांगले असले तरी ते अवाजवी वाटते. त्याऐवजी काही प्रसंगी शांतताच जास्त परिणामकारक ठरावी. ओळीनं बासरी, व्हायोलिन, सतार त्रासदायक होते. प्रकाशयोजना हासुद्धा बराचसा जमेचा भाग.

प्रदीप प्रधानांचे नाटकी पॉज् (Pause) सोडले तर एकूणात प्रयोग मानसिक संघर्ष चितारण्यात यशस्वी झाला आहे. त्यामुळेच पहिले पाऊल असले तरी हे नाटक अपेक्षा वाढविण्यास हरकत नाही.

– विवेक महाडिक

---

चित्रपट । सदानंद बोरसे

# धाकटी मेहुणी

**हिंदी वाइन इन मराठी बॉटल !**

---

मध्यंतरापर्यंत निरनिराळ्या गोष्टींनी वेळ भरून काढत प्रेक्षकाला पुरेसा कंटाळा आणला की, मध्यंतराच्या तीन–चार मिनिटे आधी एकदम रक्ताच्या थारोळ्यात पडलेलं प्रेत निर्माण करून एक रहस्य बनवायचं आणि मग पुन्हा ते उलगडण्यासाठी मध्यंतरानंतरचा वेळ निरनिराळ्या गोष्टींनी भरून काढीत प्रेक्षकाला उठून जाण्याइतपत कंटाळा आणायचा, असा एक नवीन साचा सध्या अनेक हिंदी आणि त्यामुळे साहजिकच काही मराठी चित्रपटांमध्ये दिसून येतो.

'धाकटी मेहुणी' हा एक अशाच साच्यातून निघालेला चित्रपट. डॉ. प्रवीण चक्रदेव, त्यांची पत्नी माधुरी आणि मुलगी पिंकी यांचा सुखी संसार, माधुरीच्या धाकट्या बहिणीच्या–सुमतीच्या आगमनाने त्यात उठलेले वादळ एवढा कथाभाग सांगणारे अनेक प्रसंग पडद्यावर येतात. मग सुमती व माधुरीच्या भांडणात सुमतीच्या हातून माधुरीचा खून होतो. त्या खुनाच्या आरोपाखाली डॉ. प्रवीणला पकडल्यानंतर मध्यंतर होतं.

मध्यंतरानंतर न्यायप्रिय, सद्धर्मप्रतिपालक कायद्याची बूज राखण्यासाठी अनेक योगायोगांच्या मदतीने पिंकी हा eye-witness कोर्टासमोर येतो. मग प्रवीणची सुटका, सुमतीला शिक्षा वगैरे.

मराठी चित्रपटांचं ठराविक तमाशावळण सोडून लिहिलेली विनायक देऊळगावकरांची ही कथा वेगळी असूनही पकड घेणारी ठरली नाही, त्याची प्रमुख दोन कारणे आहेत. एक– मध्यंतरापर्यंत कथा अत्यंत सामान्य वळणाने जाते. मध्यंतरापूर्वीचा पाच–सात मिनिटांचा भांडणाचा भाग वगळल्यास तोपर्यंत तेच कौटुंबिक वातावरण, तेच शिळे विनोद, मग तेच संशय निर्माण करणारे प्रसंग, बागेतील नाच, पश्चात्ताप इत्यादी इत्यादी. दुसरं– मध्यंतरानंतर रहस्याचा असा भाग उरतो तो एकच– खून पिंकीने प्रत्यक्ष पाहिलेला असल्याने तिला कोर्टात हजर करणं. त्यासाठी हरवलेल्या पिंकीचा शोध. या शोधालाही कोणतीही पद्धतशीर दिशा न मिळाल्याने ( म्हणजे चित्रपटातून तसं दाखवलेलं नाही. चित्रपटातील पिंकीचा शोध = बाबुल व त्याच्या बायकोचे वेडगळ प्रयत्न ) पकड घेऊ शकणारा हा एकमेव भाग योगायोगांच्या गर्दीत हरवला जातो किंवा प्रेक्षकांच्या दृष्टीने परिणाम पुढे स्पष्ट दिसत असताना झटकन तो न साधल्याने अवास्तव ताणला जातो.

आपल्या अंगावर शेकणाऱ्या प्रसंगांमधून बाहेर निसटण्यासाठी सुमतीने केलेली नाटकं, मारलेल्या थापा हा कथेतील त्यातल्या त्यात उल्लेखनीय भाग; पण यातही सातत्य राखण्याची जाण नाही, तर सोयिस्करपणाच अधिक जपलेला. उदाहरणार्थ– इतर वेळी धडाधड थापा मारणारी, इतकंच काय शेवटी पिंकीचा खून करू पाहणारी सुमती जेलमधील डॉ. प्रवीणला मात्र पिंकीला सांभाळण्याचं खोटं वचन न देता निघून जाते. कारण तिला शब्दात बांधून घेणं नको असतं. एखाद्याच्या मनातील परस्परविरोधी विचारांचं द्वंद्व असं केवळ शाब्दिक पातळीवर व्यक्त करता येत नाही.

चित्रपटाचा एकच mood निर्माण करून तोच शेवटपर्यंत जास्तीत जास्त तीव्रतेने प्रेक्षकांपर्यंत नेणं, ही कल्पनाच आपल्या चित्रपटांना वर्ज्य असावी; त्यामुळेच अत्यंत सुरेख ताण निर्माण करू शकणाऱ्या या चित्रपटाला हास्य, करुण, शृंगार इत्यादी विविध रसांमध्ये यथेच्छ बुडवून काढून फक्त तो ताणच तेवढा काढून घेतलेला आहे. शरद तळवलकरांचा विनोद, 'मी भारतीय नारी' हे गाणं, मेडिकल कॉलेजचा वर्ग व गॅदरिंग हे असे चित्रपट बिघडवणारे भाग. काही कलाकारांचा असमाधानकारक अभिनय हाही चित्रपट खाली आणणारा एक प्रमुख भाग.

यात पहिला क्रमांक लागतो – माधुरीचं काम करणाऱ्या नवतारका लेखाचा. पहिल्याच चित्रपटात एवढा मोठा वाव असलेली भूमिका मिळूनही आपल्या कर्तृत्वाने लेखाने त्या भूमिकेची माती केली आहे. एकाच विशिष्ट लयीत सर्व वाक्यं म्हणणं हा तिचा सर्वांत मोठा दोष. 'भाऊजीऽ, शंभर रुपयांची पैऽज, हाराल बरंऽ.' हे वाक्य असो अथवा 'माझ्या संसारात, विऽष कालवतेस, कुल्टा ऽ हेस तू.' हे वाक्य असो, ती एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणे सर्व भावभावना, विचार-विकार समान मानून एका विशिष्ट अंतराने थांबत, ठराविक अंतरावरील शब्दांवर जोर देत वाक्य म्हणून टाकते. शिवाय चित्रपटात तिच्या वाट्याला छोटी-छोटी वाक्यंही कमी आहेत, आहेत ती सगळी सहा-सात वा अधिक शब्द असलेली बडी बडी वाक्यं, त्यामुळे तर तिची फारच तारांबळ उडते.

डॉ. प्रवीण चक्रदेवचं काम केलं आहे श्रीकांत मोघ्यांनी आणि इन्स्पेक्टर गौतमचं काम केलं आहे अविनाश मसुरेकरांनी. दोघांची कामं ठीक आहेत; तरीही एकूण चित्रपटाला ती तारक ठरत नाहीत. विशेषत: हलक्या-फुलक्या प्रसंगांमध्ये उगाचच मोकळेपणा दाखविण्यासाठी जाणूनबुजून दोघे करीत असलेला प्रयत्न तर अगदी केविलवाणा व नकली वाटतो.

सरला येवलेकर (सुमती) व बेबी शिल्पा (पिंकी) या दोघीही चित्रपटात होत्या.

चित्रपटाची गीतं गंगाधर महांबरे यांनी लिहिलेली होती तर संगीत राम किंकर यांचं. 'धुंद धुंद ही हवा' हे आशा भोसले व सुरेश वाडकर यांनी गायलेलं गीत आणि 'पिंकी ग, माझी पिंकी ग' हे बालगीत अतिशय छान झालं आहे, तर 'मी भारतीय नारी' हे गीत शब्द, संगीत आणि प्रत्यक्ष चित्रण या तिन्ही दृष्टींनी अत्यंत भिकार व टाकाऊ झालं आहे.

या गाण्याचे शब्द काय, तर

'मी भारतीय नारी
नेसुन साडी नऊ वारी
युगायुगातुन करिते फेरी.'

यानंतर पुढे चोरी, खारी, बेरीबेरीपासून तुरी, पुरी मारामारीपर्यंच्या सर्व 'री' मी ओढून ठेवल्या होत्या. चित्रपटात मेडिकल कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये नाचाच्या प्रसंगी हे गीत आहे. हे गीत काय किंवा कॉलेजच्या वर्गातील प्रसंग काय, बाकी दृश्यांमध्ये दवाखाने, बंगले इत्यादी गोष्टींकडे बरे लक्ष दिलेल्या दिग्दर्शक दत्ता धर्माधिकारींनी एक तर मेडिकल कॉलेजमधील प्रसंगांकडे दुर्लक्ष केलं आहे किंवा त्यांची टवाळी उडविली आहे.

मुंबईच्या मेडिकल कॉलेजातील वर्गात हृदयाच्या आकृत्यांचे तक्ते चौथीच्या 'सामान्य-विज्ञान' (ले.–नरवणे-ब्रावडेकर) मध्ये असल्यासारखे असतील का? किंवा या कॉलेजच्या गॅदरिंगमधील नाचासाठी खेड्यातील रामलीलावाल्यांचं स्टेज मिळेल का? किंवा गॅदरिंगच्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसाठी अत्यंत भिकार व टुकार वाक असतील का आणि त्यांच्यावर मोजून पंधरा-सोळा टाळकी आणितेवढीच गर्दी मावणारा हॉल अशी परिस्थिती असेल का?

जाऊ द्या. या प्रश्नांची उत्तरं मिळण्याऐवजी निर्माता-दिग्दर्शक दत्ता धर्माधिकारी मराठी निर्मात्यांचा ठेवणीतील राग गरीब-कल्याण आळवू लागायचे.

थोडक्यात–चित्रपटाची प्रकृती लक्षात न घेता हिंदी फॉर्म्युला वापरून त्याच्यात 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' असा मसाला ठासण्याच्या प्रयत्नात चित्रपटाचा कसा चिचका होतो–याचं सुरेख उदाहरण म्हणजे 'धाकटी मेहुणी!'

ता. क. – भलभलते चित्रपट 'U' ठरवून उगाचच एखाद्या चित्रपटावर 'A'ची मोहोर ठोकण्याचं हे कसब सेन्सॉर बोर्डाचं म्हणायचं की चित्रपट-निर्मात्यांचाच गर्दी खेचण्याचा सोस म्हणायचा? म्हणजे चला, बरा चित्रपट म्हणून नाही, पण निदान 'A' चित्रपट म्हणून तरी काही आंबटशौकीन गर्दी करतील.

☐

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा............

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

## क्षिप्रा नदीच्या तीरावरून : पृष्ठ ४ वरून

हवा. शेतीमालाचे भाव वाढले तर त्यालाही मोठ्या प्रमाणात फटका बसेल हे लक्षात ठेवूनच सरकार आपले धोरण आखीत आहे. आपल्या भाषणात भानुप्रतापजींनी किसान-मेळाव्याचा उल्लेख करून आपण किसानांचे हितकर्ते असल्याचा दावा केला. त्यानंतर बोलणाऱ्या सोनुसिंग पाटलांनी किसान-मेळाव्याला जोरदार विरोध तर केलाच, पण किसानांचे नेते वस्तुतः निव्वळ वकील आहेत. किसानांना भडकविण्याचे उद्योग ते करतात इ. बरीच टीका केली. असे समरप्रसंग वारंवार उद्‌भवल्याने तटस्थ श्रोत्यांची चांगलीच करमणूक होत होती.

अशीच एक चकमक बिजू पटनाईकांच्या भाषणानंतर उडाली. कामगारांबद्दल ते म्हणाले की, आज-काल कामगार अजिबात काम करीत नाहीत. अगदी अद्ययावत यंत्रसामुग्री वापरूनही बोकारो पोलाद कारखान्याची उत्पादनवाढ फक्त १०% आहे. तीच यंत्रे वापरून व त्याच कच्च्या मालातून विदेशात ५०% उत्पादनवाढ झाल्याचे दाखले आहेत आपले कामगार आळशी आहेत, या पटनाईकांच्या निष्कर्षावर एकच गदारोळ उडाला आणि त्यांना अनेक शाब्दिक चकमकींना तोंड द्यावे लागले. अनेक कामगार-नेत्यांनी या विधानाला जोरदार आक्षेप घेतला.

हा प्रसंग घडला तो औद्योगिक संबंध विधेयकाबाबतची चर्चा चालू असताना. या चर्चेत लक्षात रहाण्याजोगे भाषण झाले ते मजूरमंत्री रविन्द्र वर्मा यांचे. आपल्या प्रभावी इंग्रजीत त्यांनी हे विधेयक कामगारहिताचे कसे आहे ते खुलासेवार सांगितले. या विधेयकामुळे प्रथमच मालकाची मालमत्ता तपासून पहाण्याचा अधिकार कामगारसंघटनाना मिळाला आहे. शिवाय संघटनांवर आलेली बंधने वाजवी अशा स्वरूपाचीच आहेत. एक कामगार-नेता जास्तीत जास्त चार संघटनांचा अध्यक्ष राहू शकतो — या विधेयकातील तरतुदीचे समर्थन करताना वर्मा म्हणाले की, आज एक कामगार नेता ३०४ संघटनांचा नेता आहे. उद्या ही संख्या ३६५ वर गेली तर रोज वेगवेगळ्या संघटनांचे काम त्याला बघावे लागेल. तेव्हा या बाबतचे बंधन आवश्यकच आहे.

एका अनौपचारिक चर्चेत रेल्वेमंत्री मधू दंडवते यांनीही, या विधेयकाचा थंड डोक्याने विचार व्हावा असं सांगितलं. फार काय, पण आपल्या एका मार्क्सवादी मित्रानं हे विधेयक म्हणजे एक इतिहास असल्याचं सांगितलं आहे (खाजगीत), असंही ते म्हणाले.

रवीन्द्र वर्मांच्या भाषणाचं विधेयकाच्या विरोधकांनीही कौतुक केलं. बागाईतकर म्हणाले, 'वर्माजीने एक बहुतही बूरी केस बहुतही अच्छी तरहसे argue की है !'

सरकारी बाबींवर आलेल्या या चर्चेत राजस्थान राज्य जनताचे अध्यक्ष टीकाराम पालीवाल यांनी मात्र राज्य व केंद्र सरकारचं चांगल्या कारभाराबद्दल कौतुक केलं. आमच्या राजस्थानात या आणि लोकांना विचारा, लोक जनता राजवटीला दुवे देतील, असं ते म्हणाले. या चर्चेत गुजरात, हिमाचल व मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री व अन्य काही जनता राज्यांचे मंत्री यांनी आपापल्या प्रशासनाच्या Performance वर प्रकाश टाकला. यापैकी अनेकांच्या शासनाच्या माहितीखात्याने आपल्या राज्याच्या प्रगतीचे अहवाल शिबिरात मुक्त हस्ताने वाटले होतेच. महाराष्ट्राचे महसूल मंत्री उत्तमराव पाटील व अन्य काही जण शिबिराला हजर होते; पण या चर्चेत त्यांनी भाषणे वगैरे अजिबात केली नाहीत.

सर्वाधिक वादळी चर्चा झाली ती 'ब' गटात जेव्हा रा. स्व. संघाचा विषय निघाला तेव्हा उ. प्र. जनता पक्षाने सचिव मोहन सिंह, खा. शरद यादव, रामानंद तिवारी इ. अनेकांनी संघावर आरोपांची सरबत्ती केली. संघाने दंगली घडविल्या, संघ परधर्मीयांना ठार मारतो इथपासून संघाचे स्वयंसेवक सरकारी कामात हस्तक्षेप करतात इथपर्यंत अनेक गंभीर आरोपांची उजळणी या वक्त्यांनी केली. याचा प्रतिवाद करताना जे. पी. माथुर व अन्य काही मध्यप्रदेशीय खासदारांनी केलेला मुक्तिवाद उल्लेखनीय आहे. हे खासदार म्हणाले की, संघावर अगदी अशीच टीका पूर्वीही होत होती व आजही होत आहे मग संघ इतका वाईट, इतका विघातक आहे हे जर तुम्हाला ठाऊक होते तर मग जनता पक्ष निर्माण करतानाच तुम्ही जनसंघ-प्रवेशाला विरोध का केला नाही ? याचं कारण संघाचे सहकार्य मिळावे ही तेव्हा तुमची गरज होती. आज संघ बदनाम करण्यात तुम्हाला स्वारस्य आहे. एकूण काय तर संघाचे बरे–वाईटपण हे तुमच्या गरजांचे परिणाम आहेत. त्यातूनही संघ, जनसंघ इतके वाईट आहेत असं तुम्हाला खरंच वाटत असेल तर संघ-स्वयंसेवकांनी जनता पक्षात येऊ नये असा ठराव आत्ताच विनाविलंब मंजूर करा ! संघ-स्वयंसेवक त्यालाही तयार आहेत.

याच चर्चेत एक खासदार श्री. श्रीधरन म्हणाले की, संघाचे स्वयंसेवक परधर्मीय व्यक्तींना मारून टाकतात व त्यांच्यावर हल्ले करून जातीय विद्वेष फैलावतात.

त्यांच्या या आरोपाला खा. जगन्नाथराव जोशी यानी उत्तर दिले. १६ तारखेला राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीतही या विषयावर चर्चा झाली. संघाचा अलिगढच्या दंगलीत हात आहे, हेही या वेळी ठासून सांगितले गेले. त्यावर पंतप्रधान देसाईंनी सांगितले की, संघाचा खरोखरच दंगली घडविण्यात काही हात असेल तर इथे आरोप करणाऱ्या सदस्यांनी त्यांच्याजवळचे पुरावे सादर करावेत, मी संपूर्ण चौकशीचे आदेश द्यायला तयार आहे. वास्तविक यानंतर आरोप करणाऱ्यांकडून पुरावेच पुरावे यायला हवे होते; पण गप्प बसण्यापलीकडे, आरोप करणारी मंडळी, अन्य काहीच करीत नव्हती.

या चर्चेत भाग घेताना पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांनीही दंगली घडवून आणण्यात रा. स्व. संघाचा हात नाही, याबद्दल आपली खात्री झाली असल्याचे स्पष्टपणे सांगितले. मधू दंडवते म्हणाले की, अलग उद्दिष्टे असलेली, रा. स्व. संघ ही एक अलग संघटना आहे. तेव्हा उगीचच त्या बाबत चर्चा करून वेळ वाया घालवू नये. लगेचच मुंबईच्याच एका खासदाराने त्यांना सुनावले की, संघ वेगळा आहे तो केवळ तात्त्विकदृष्ट्या. प्रत्यक्षात संघाचा शिरकाव सर्वत्रच आहे.

कार्यकारिणीच्या बैठकीनंतर मोरारजींच्या भाषणाचा कार्यक्रम झाला. सुरुवातीलाच दिल्लीचे एक समाजवादी नेते राजकुमार जैन यांनी पंतप्रधानांच्या भाषणात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. कांती देसाई प्रकरणी चौकशी व्हावी अशी त्यांची मागणी होती. चंद्रशेखरांनी त्यांना गप्प बसविले; पण नंतर मध्यप्रदेशचे रघू ठाकूर यांनी ऊस-उत्पादकांच्या तक्रारीबद्दल आरडाओरडा सुरू केला.

शेवटी शांतता निर्माण झाल्यावर मोरारजी बोलायला उठले. त्यांच्याआधी उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडीस यांचं भाषण झालं होतं. जॉर्जचा मूड विलक्षण विमनस्क ! भाषणाचा एकूण सूर सरकार-विरोधी. त्यांच्या भाषणातला मुख्य मुद्दा चिकमगळूरच्या निवडणुकीतील पराभवाबद्दलचा. गेल्या १९ महिन्यात आपण लक्षवेधी असं काहीही करू शकलो नाही त्यामुळेच आपण निवडणुकीत हरलो असा त्यांचा निष्कर्ष ! अशा सगळ्या निराशाजनक पार्श्वभूमीवर पंतप्रधानांचं भाषण सुरू झालं.

पहिल्या वाक्यापासूनच मोरारजींच्या भाषणात काही तरी हरवल्यासारखा, नेहमीपेक्षा एक वेगळा मूड जाणवत होता; पण तरीही सरकारची बाजू त्यांनी समर्थपणे मांडली. जॉर्जच्या निराशेचा उल्लेख न करता ते म्हणाले... काहीजण सत्ता स्वीकारायलाही तयार नव्हते. फार काय पण निवडणुका लढविण्यासाठी त्यांचा विरोध होता; पण आम्ही आव्हाने नेहमीच धीटपणे स्वीकारली. जशी स्वीकारली तशी ती पेलण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही निश्चितपणे करीत आहोत.

मोरारजी म्हणाले–' बहुत सारे क्षेत्रों में हमने जो कुछ किया, शायद वह पर्याप्त नहीं है, मगर निश्चितही उन बातोंकी अनदेखी नहीं की जा सकती ' जॉर्जच्या भाषणात मुंबईच्या निवडणुकीत २५% ने मते कमी झाल्याचा उल्लेख होता. त्याला अनुलक्षून पंतप्रधान म्हणाले की, शेवटी लोकसभा व महापालिकेच्या निवडणुकीत फरक असतो. प्रश्न वेगळे असतात. साहजिकच मतांच्या प्रमाणात फरक पडणारच.

बागाईतकरांच्या टीकेला उत्तर देताना मोरारजींनी स्पष्ट केले की, मी कर्मवादी आहे, मी योगी कशाला बनू ? आणि हुकूमशहा तर मुळीच नाही. माझ्या कार्यपद्धतीत हुकूमशाही असल्याचे एक जरी उदाहरण दाखविलेत तरी मी राजीनामा द्यायला तयार आहे !

त्याच दिवशी उज्जैनच्या दशहरा मैदनावर मोरारजींची जाहीर सभा झाली. त्या वेळी माझ्या शेजारच्याच रांगेत खा. कमल बहुगुणा बसल्या होत्या. जनतातील या आत्मपरीक्षणाच्या लाटेबद्दल त्या सहजच म्हणाल्या,—' ये लोग Excuses क्यों नहीं ढूंढते ?' बाढ आए हैं, ये हुआ है, वो हुआ है, इसलिये हम कुछ कर नहीं पाए ' असं यांनी सांगायला हवं !' शुद्ध राजकारणी प्रवृत्तीचे विचार म्हणतात ते असे.

१७ तारखेला चंद्रशेखरांच्या भाषणाने शिबिराचा समारोप झाला. चंद्रशेखरांचं हे भाषण खूपच वैशिष्टयपूर्ण होते. चंद्रशेखर म्हणाले की, ' आम्ही इंदिरा गांधींच्या भीतीपोटी एकत्र आहोत असा आशय निघता कामा नये. लोकांच्या समर्थनावर अखेर सत्तेची सूत्रे अवलंबून आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे यापुढे स्वतंत्रपणे जगणे कोणत्याही घटक पक्षाला शक्य नाही. कारण १९७७ च्या निवडणुकीपूर्वीची स्थिती, ती लोकप्रियता कमावण्याची ताकद आज कोणातही नाही. जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांमधील भांडणांमुळे जनता पक्षाची प्रतिमा डागळली आहे. केवळ त्यांनीच नव्हे तर सर्वांनीच हे लक्षात ठेवले पाहिजे की, We have to swim and sink togather आपल्या मध्यप्रदेश, बिहार, राजस्थान, गुजरात इ. सरकारांनी काही चांगले निर्णय घेतले आहेत. त्यांचा प्रभाव पडण्याऐवजी नेत्यांच्या भांडणांमुळे प्रतिकूल परिणाम होत आहे. नेत्यांनी हे जाणले पाहिजे की, पंतप्रधान, गृहमंत्री कोण आहेत यात लोकांना स्वारस्य नाही. ते किती कार्यक्षम व लोकहितदक्ष आहेत यात लोकांना रुची आहे. '

चंद्रशेखरांच्या भाषणाने या शिबिराचा समारोप झाला. इतर अनेक गोष्टींबरोबर याच शिबिरात एका चर्चेत एसेम जोशींनी जे उद्गार काढले ते आम्हा सर्वांच्याच लक्षात रहायला हवेत. एसेम म्हणाले होते की, ' अन्य देशात जेव्हा क्रांती झाली तेव्हा तिथला हुकूमशहा मेलेला होता. तो पुन्हा सत्तेवर येण्याची शक्यता नव्हती. भारतात तसे नाही. जनता पक्षाची वाटचाल अशीच सुरू राहिली तर विलक्षण वेगाने परतणारा ' तो ' हुकूमशहा पुन्हा एकदा सिंहासन काबीज करील !' एसेमसारख्या वडीलधाऱ्या व्यक्तीचे हे विचार त्यांच्याहूनही वडील असलेले जनता-नेते समजून घेतील काय ?

क्षिप्रेच्या तीरावरून आलेले वारे हे असे आहेत. जिवापाड श्रम करून अनेक कार्यकर्त्यांनी जनता पक्षाला निवडून दिले. एक प्रकारचा विश्वास त्यांनी जोपासला. जनता पक्षात सुरू झालेले आत्मपरीक्षण ह्या विश्वासाला जागविण्यात लाभदायी ठरेल हे खरेच, पण एक काळजी घ्यायला हवी. शेवटी आत्मपरीक्षणाचे रूपांतर परस्परांच्या डोक्यावर खापर फोडण्यात आणि शेवटी सर्वांच्याच उद्विग्नतेत होऊ नये. जनता पक्ष ही अखेर लोकांची चळवळ आहे, ती तशीच ठेवायची असेल तर हे पथ्य पाळले पाहिजे.

खरं तर राजकारण आणि आत्मपरीक्षण यांचा फारसा संबंध नसतो. जनता पक्षीयांनी ते केले. कारण तो ( बऱ्याच अंशी तरी ) एक ' चांगल्यांचा पक्ष ' आहे, जनता राजवट ही ' चांगल्यांची राजवट ' आहे; पण केवळ तेवढे पुरेसे नाही. ' चांगले राज्य ' बनविण्याकडेही जनता-नेत्यांनी लवकर लक्ष पुरवायला हवं !

–निरीक्षक